ज्योतिर्मयी

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ३१ वा ❑ भारतीय सौर दिनांक १७ फाल्गुन शके १९४७, रविवार दि.०८ मार्च २०२६ ❑ पाने १० ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

सर्व लेखिकांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

डॉ. मीना श्रीवास्तव
ठाणे (पश्चिम)

सौ. माधुरी पळणिटकर,
सातारा. मो. 9921495533

अपर्णा परांजपे,
पुणे मो. 95030 45495

सौ उज्वला धर्माधिकारी
पुणे. 75882 35646


डॉ. निर्मोही फडके,
ठाणे. मो. 99201 46711

शीतल गायकवाड, पुणे.
(मोबाईल : 9923175624)

विभावरी कुलकर्णी
८०८७८१०१९७

डॉ. अपेक्षा नाकतोडे
मराठी विभाग
बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी.
मोबाईल नंबर - 7387340467

सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक.
श्री क्षेत्र निनाम-सातारा
सं. क्र.-९७६७४३७९२३

सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
मा.उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. फोन :9822749758

रंजना सानप
मायणी (सातारा)
मोबाईल नंबर-9049548323




सौ शुभांगी हेमंत पांगरकर
छत्रपती संभाजीनगर,
9422214122

सौ.रचना गिरीश वसेकर
पुणे, सेल ९४२२१७५७४९

प्रा. डॉ. वैशाली बोदेले
नाट्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

प्रा.प्राजक्ता कुंभार
राज्यशास्त्र विभाग
बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी


सौ भारती सावंत, पालघर


सौ जयश्री विनायकराव कुलकर्णी
गोपेवाडीकर, छ. संभाजीनगर

वर्षा बेंडिगेरी कुलकर्णी
पुणे, ९७६७५८८९३७

राजश्री कुलकर्णी
पुणे

अर्चना ठाकरे मोरे
मूर्तिजापूर मो.96374 29655

संगीता सुहास अरबुने,
वसई (पूर्व) मो. ८०८०२३३९६३

सौ.प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर मो. 95525 61612

✍ सीमा गाडेकर
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी,
छत्रपती संभाजीनगर. 94 23 17 23 05

प्राची गडकरी, (डोंबिवली)

सौ आरती परिचारक
पंढरपूर

सौ. अर्चना जोशी
छत्रपती संभाजीनगर


सौ.नीलिमा मकरंद बोकील, पुणे
मो. 94204 95478

अर्चना हिंग्लजकर,
शिरवळ, 9225527464

सौ.प्रियंका गौरव जावळे.
मो. 74208 57257

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई मो. 95520 98477

सौ.माधुरी म.इनामदार
मिरज. मो. 78755 99497

सौ.संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
७८२१८१६४८५

धनश्री राजकुमार मुसने
चंद्रपूर मो. 76666 29184

अँकर भावना
छत्रपती संभाजीनगर


सौ विनया माधव जोशी
मुंबई

सौ. प्रिया धिरेन शहा, सांगली

सौ.वैशाली जनार्दन कदम (कणसे)
शाळा जावली, ता. महाबळेश्वर,
जि.सातारा, मो. -9423484216

डॉ शारदा शेवतेकर

मृणालिनी गायकवाड कोळेकर

डॉ क्षितिजा पंडित
मो. ९४२२०३३९५०

सौ. स्नेहा मुश्रीफ
पुणे

सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

कल्पना मापुसकर
मुंबई

सौ. मानसी सोनपेठकर,
पुणे

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका, विरार मुंबई
मो. 97301 74088

सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजीनगर

रोहिणी रविंद्र इनामदार,
सातारा

जात्यावरच्या ओव्या.....

मायबापा झाली जड
जगाची जगरीत
कसा गोळा पोटचा
टाकू लोकाच्या वटीत ||५३२||

मायबापान वाढवल
जणू डोळ्याची पापणी
नही रोकण - टोकण
किती लाड बालपणी! ||५३३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक - भाग ४

ज्योतिर्मय साहित्य

नीती म्हणजे आचरणातील सुसंगती. सज्जनांनी घालून दिलेल्या मार्गावर वाटचाल करणे. आजच्या काळात प्रसारमाध्यमे, सामाजिक वातावरण, स्पर्धेची धडपड या सर्वांचा परिणाम मनावर होत असतो. कधी कधी अनैतिक मार्गाने यश मिळताना दिसते. मग मन म्हणते, '' मीच कशाला चांगले वागू ? माझ्यामुळे असा काय फरक पडणार आहे ?'' पण समाजाचा पाया हा प्रत्येकाच्या व्यक्तिगत नीतीवर उभा असतो. आपला छोटा तडजोडीचा निर्णयही मोठ्या अध:पतनाची सुरुवात ठरू शकतो.

या श्लोकात समर्थ पुढे म्हणतात, ''मना अंतरी सार विचार राहो.'' सार म्हणजे जे खरे, टिकाऊ, मूल्याधिष्ठित आहे ते.

क्षणिक लाभ, राग, द्वेष, मत्सरहे असार.

प्रेम, करुणा, प्रामाणिकपणा, संयमहे सार.

आपली वाटचाल प्रेयसकडून श्रेयसकडे व्हावी, हीच समर्थांची अपेक्षा आहे. मोठ्या प्रतिज्ञेपेक्षा छोटा पण सातत्यपूर्ण प्रयत्न अधिक प्रभावी असतो. मनावर कठोर बंधने लादण्यापेक्षा छोट्या, पाळता येतील

अशा नियमांनी सुरुवात केली तर संस्कार हळूहळू दृढ होतात. श्रेयसाचा मार्ग हा टप्प्याटप्प्याने चालायचा असतो. मन जसे घडवू, तसे जीवन घडते. म्हणूनच समर्थांचे हे आवाहन केवळ उपदेश नाही; ती अंतःकरण शुद्धीची दिशा आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर स्वतःशी थोडा संवाद साधू या.

स्वसंवाद : माझ्या मनात येणाऱ्या नकारात्मक विचारांना मी ओळखून त्यांच्यावर संयम ठेवतो का?

तात्कालिक फायद्यासाठी मी कधी माझ्या मूल्यांशी तडजोड करतो का?

माझ्या निर्णयांत श्रेयस अधिक आहे की प्रेयस?

'सार विचार' मनात टिकून राहावेत यासाठी मी रोज काय करतो?

(क्रमशः)





दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

स्वस्वरूपाविषयींचा संदेह (मनाची अस्थिरता) हा जन्माचे मूळ असते. उत्तमोत्तम श्रवणाने तो निर्मूळ होतो. मन नि:संदेह बनले की आपपरभाव मनात रहात नाही. सगळं जग स्वच्छ, सुंदर दिसायला लागते. याला समाधान असे म्हणतात.

श्रवणमननाने चित्तवृत्ती शुध्द होते. ज्या परमार्थ स्थानात नित्य नियमांचे श्रवण नाही त्यांची चित्तवृत्ती समाधानी नसते. स्वतः च्या स्वार्थासाठी तरी श्रवणभक्ति केव्हाही उत्तम असते. आपल्याला आपल्यात बदल घडवायचा आहे? तर परमार्थ साधना केली पाहिजे. मनापासून साधना करावी. जे जे उत्तम आहे उदात्त आहे. त्यांचे नेहमीच उदात्तीकरण करावे.

आज सकाळी मी नाष्टा केला आता मला दूपारी भूक नाही असे होत नाही. मी परत दूपारी यथेच्छ जेवते. रात्रीच्या जेवणावर ताव मारते.

हे जसं माझ्या आयुष्यात नित्य दिनक्रम चालू आहे, अन्नपाणी, विश्रांती जशी जगण्याची गरज आहे तसा आत्मकल्याण करून घेण्यासाठी सतत संतसंगतीत रहावे श्रवणानंद लुटावा.

मनापासून साधना करावी.
परमात्मा आपलं स्वतंत्र अस्तित्व सिध्द करेल.
यावर विश्वास ठेवावा.
जय जय रघुवीर समर्थ
श्रीराम जय राम जय जय राम
समास आठवा समाप्त

***



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामस्मरण व एकाग्रता

ज्योतिर्मय साहित्य

नामस्मरण करताना चित्त एकाग्र का होत नाही ? त्याकरिता काय करावे ? नामस्मरण करीत असताना हजार तऱ्हेचे विचार मनात येतात हे खरे. त्यांना आवरण्याचा पहिला उपाय म्हणजे त्या विचारांच्या मागे न जाणे. विचार मनात आले तर त्या विचारांना फाटे फोडून ते वाढवू नयेत; म्हणजेच मनोराज्य करू नये. विचार येतील तसे जातील, तिकडे लक्ष देऊ नये. चित्त एकाग्र होण्याकरताच नामस्मरणाची गरज आहे. चित्ताची एकाग्रता ही फार पुढची पायरी आहे. चित्त चंचल आहे, त्याला कुठेतरी स्थिर करून ठेवल्याशिवाय भागत नाही, म्हणून ते नामात गुंतवून ठेवावे. नामस्मरण करीत असताना ते नाम आपल्या कानांनी ऐकावे, म्हणजे एकाग्रता व्हायला मदत होईल. एकाग्रता झाल्याशिवाय नाम घेण्यात अर्थ नाही, आणि नामाशिवाय एकाग्रता होणार नाही, या संशयात न पडता साधे, सोपे नाम घ्यावे म्हणजे आपोआप एकाग्रता येईल.

दुसरी गोष्ट अशी की, ज्याची आपल्याला आवड असते त्यात आपल्याला एकाग्र होता येते. आपल्याला विषयाची आवड असते म्हणून विषयाचे सेवन करताना आपण एकाग्र होतो; मग त्याचप्रमाणे विषयाच्या ऐवजी आपण परमात्म्याची आवड धरली तर त्याच्या ठिकाणीही एकाग्र होता येणार नाही का ? म्हणून, आज विषयाची जितकी आवड आहे तितकीच देवाच्या प्राप्तीबद्दलही आवड ठेवावी, म्हणजे आपल्याला त्याच्या ठिकाणी एकाग्र होता येईल. एकाग्र होणे म्हणजे त्या ठिकाणी समरस होणे. मीठ पाण्यात टाकले म्हणजे ते पाण्याहून वेगळे राहते का ? योग केल्याने एकाग्र होता येईल खरे, पण जोपर्यंत समाधी आहे तोपर्यंतच ती एकाग्रता टिकेल. सर्वांभूती भगवद्भाव पाहणे हेच खरे एकाग्रतेचे साधन. सर्व ठिकाणी तोच भरलेला आहे असे समजल्यावर द्वैत कुठे राहिले ? आणि जिथे द्वैत गेले तिथे आपोआप एकाग्रता आलीच. अशी एकाग्रता साधते तीच खरी समाधी होय.

मनुष्य अगदी एकटा असला किंवा एकान्तात असला तरी आपल्या कल्पनेने तो अनेक माणसे आपल्या भोवती गोळा करतो. विशेषत: विद्वान् लोकांना कल्पना जास्त असतात. तेव्हा कल्पना करायचीच तर ती भगवंताविषयी करू या. भगवंत हा दाता आहे, त्राता आहे, सुख देणारा आहे, अशी कल्पना आपण करू या; त्यातच खरे हित आहे. कल्पनेच्या पलीकडे असणारा परमात्मा आपण कल्पनेत आणून सगुण करावा, आणि तिथेच आपले चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न करावा.

मन एकाग्र होत नसेल तर न होवो, पण नामस्मरण सोडू नये.

***

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस दुसरा

पुढे.....
कथा कीर्तनात निमंत्रणा शिवाय जा. तिथे मान अपमान समजू नका.यज्ञात भगवान शिव जात नव्हते.माता जाऊ म्हणाल्या. निमंत्रण नव्हते.दक्षाने शिवास दूषणे लावली. तेही शिरोधार्य झाले. प्रतिकूलतेतून अनुकूलता शोधणे हे जमावे. हीच अध्यात्माची अपेक्षा आहे.
वारीत पंढरपूरला एक ठिकाणी खूप ढेकूण होते. लोक तक्रार करू लागले.एक महात्मा म्हणे "अरे काय त्रासून जाता, हे ढेकूण सांगतात, वारीला आलात ना ?हे ढेकूण सांगतात झोपताय काय उठा भजन करा. असा सकारात्मक दृष्टिकोन असावा.
बंधनातून मुक्त व्हावं म्हणून गजेंद्राची स्तुती आहे.क्रोध शांत व्हावा म्हणून प्रल्हादाने स्तुती केली.कांहीं वेद स्तुती भागवतात आल्या आहेत.
पूर्णात पूर्ण मुदच्यते पूर्णस्य पूर्ण मादा य पूर्ण मेवा वशिष्यते
पृथुची स्तुती का केली? त्याने कोणतेही कर्तृत्व केले नव्हते.या स्तुती ने यातील शब्द सत्यात यावेत म्हणून होती.त्याने प्रभूची स्तुती ऐकण्या साठी 10000 कान मागितले. ही साधन स्तुती आहे.
वारकऱ्यांना दिंडीत एकदा आनंद यायला लागला की, त्याला पंढरपुर इतक्यात येऊ नये असे वाटते.साधनेत आनंद मिळायला लागली की साध्या पेक्षा साधन महत्वाचे वाटते.
भागवतात दशम स्कंधात 5 गीते आली आहेत. गोपी गीत,भ्रमर गीत अशी गीते आली आहेत.
गीत अंत:करणाला मार्दव आणते.स्वरावली मधून जेव्हा शब्द बाहेर पडतात, तेव्हा त्यातील काठिण्य जाऊन मार्दव येत असते.गायकांना संत म्हटले गेले आहे.संत गंगे प्रमाणे,हत्तीच्या गंड स्थळा प्रमाणे आहेत.
पद्मपुराणात गीत दु:खाचा विसर पडणारे असते. शृंगारादी सर्व 9 रस गीतात असतात.सर्व देव गीताने संतुष्ट होतात. भागवत आम्हाला कांहीं सुचवते कांहीं कल्याणाचे दर्शविते.
बाकी मंगला चरणाचा विचार उद्या करायचा आहे.
जय हो जय हो श्री भागवता
आरती करू तूज भगवंता
क्रमश :.....

डोळ्याला चष्मा-नजर कमजोर?

ज्योतिर्मय साहित्य

एक ग्लास दुधात हा पदार्थ घालून रोज प्या, नजर होईल तेज.....

डोळ्यांना चष्मा नको वाटतो, चष्म्यामुळे नाकावर खुणा उमटतात अशी बऱ्याचजणांची समस्या असते. काही सोपे व्यायाम करून तसंच खाण्यापिण्यात बदल करून तुम्ही डोळ्यांचे आरोग्य सुधारू शकता. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीनं असा एक उपाय शोधलाा आहे. ज्यामुळे रेटीनाचे नर्व्स ट्रॅक करून आरोग्याच्या समस्यांची माहिती मिळू शकते. मायोपिया. ड्राय आय सिंड्रोम आणि ग्लुकोमा यांसारख्या डोळ्यांच्या समस्या उद्भवू शकतात.

जर तुम्हाला वयाच्या चाळिशीत किंवा त्याआधीच डोळ्यांच्या समस्या उद्भवत असतील किंवा तुम्हाला धुसर दिसत असेल किंवा डोकं दुखत असेल तर ग्लुकोमा या आजाराची सुरूवात असू शकते. शुगर पेशंट्सनी हे आजार टाळण्यासाठी अजून काळजी घ्यायला हवी. डायबिटीसच्या आजारानं जगभरातील सव्वा कोटीपेक्षा जास्त लोक त्रस्त आहेत.

रिर्पोटनुसार जर तुम्हाला चष्मा काढायचा असेल तर अधुनिक शस्त्रक्रिया हा सर्वोत्तम उपाय आहे. यात लेझरच्या साहाय्यानं कॉर्नियाचा आकार बदलला जातो. हे अत्यंत सुरक्षित आणि लोकप्रिय आहे. ज्यांचा कॉर्निया पातळ असतो त्यांच्यासाठी हा पर्याय निवडला जातो. ही एक प्रगत आणि मिनिमली इन्व्हेसिव्ह पद्धत आहे. जर तुमचा नंबर खूप जास्त असेल तर डोळ्यात कायमस्वरूपी लेन्स बसवली जाते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी घरगुती उपाय कोणते...?

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी तुम्ही काही सोपे उपाय करू शकता जसं की सकाळी आणि संध्याकाळी ३० मिनिटं प्राणायम करा. अनुलोम-विलोम आणि भ्रामरी हे व्यायामसुद्धा डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतात.

*डोळे चांगले ठेवण्यासाठी महा त्रिफळा घृत पिणं फायदेशीर ठरतं...

१ ग्लास दूधासोबत १ चमचा हे चूर्ण घ्या. दिवसातून २ वेळा हा उपाय केल्यास चांगला परिणाम दिसून येईल.

एलोवेरा ज्यूस, आवळ्याचा ज्यूस डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते. तुम्हाला तुमचे डोळे चांगले ठेवायचे असतील तर नेहमी मोबाईल वापरण्याची सवय सोडायला हवी. योगगुरू बाबा रामदेव यांनी सांगितलेले उपाय तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. गाजर, रताळे, स्ट्रॉबेरी, आवळ्याचे सेवन डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते.

आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495

प्रस्तावना विषयाची..

पुढे.....
१ : योग्य-अयोग्याचा गोंधळ नैतिक निर्णयांमध्ये मनाची द्विधा अवस्था.
२ : वचनबद्धता विरुद्ध भावना कर्तव्य आणि प्रेम यातील संघर्ष.
३ : स्वार्थ की त्याग? अहंकाराची सूक्ष्म परीक्षा.
४ : बुद्धी की हृदय? तर्क आणि करुणा यातील संघर्ष.
५ : बाह्य सत्य की अंत:प्रेरणा? सामाजिक नियम विरुद्ध अंतर्मन.
६ : अपराधगंड - गेल्या निर्णयांची छाया.
७ : अहंकाराची सूक्ष्म रूपे - "मी योग्य" ही मानसिक पकड.
८ : आसक्ती - ज्याच्यावर प्रेम करतो त्याच्याशी अति गुंतणे.
९ : भय - भविष्याच्या कल्पनांनी बनलेली भीती.
१० : लोभ - अधिक हवे – पण का?
११ : प्रतिष्ठा - इतर काय म्हणतील?
१२ : ईर्ष्या - तुलना मनाला अस्थिर करते.
१३ : दांभिकता - बाहेर एक, आत दुसरे.
१४ : सूडभावना - दुखावलेपणाची प्रतिक्रिया.
१५ : क्षमा - मनाच्या मुक्तीचा टप्पा.
१६ : आत्मफसवणूक - स्वत:लाच खोटे सांगणे.
१७: अवास्तव आदर्श - पूर्णत्वाच्या कल्पनेत अडकणे.
१८ : नैतिक धैर्य - लोकमताविरुद्ध सत्य उभे करणे.
१९ : अंतर्मनातील आवाज - "हे योग्य नाही" ही सूक्ष्म जाणीव.
२० : निर्णयाची जबाबदारी - परिणाम स्वीकारण्याची तयारी.
२१ : अनिश्चितता स्वीकारणे - सर्व उत्तरं स्पष्ट नसतात.
२२ : तटस्थता - भावनिक संतुलन.
२३ : साक्षीभाव - विचारांना फक्त पाहणे.
२४ : अंतर्मुक्ती - निर्णय घेतल्यानंतर अपराधगंड न बाळगणे.
२५ : आत्मबोध - राजा आणि वेताळ यांचे एकत्व - - मन आणि साक्षी यांची समरसता.

■खोल मानसशास्त्रीय समज
वेताळ प्रत्येक वेळी प्रश्न विचारतो कारण: मनाला निश्चितता हवी असते.
जीवन मात्र बहुतेक वेळा अस्पष्ट असते.
जेव्हा विक्रम उत्तर देतो, तो तर्क वापरतो - पण शांततेतून. याचा अर्थ - निर्णय बुद्धीने घ्यावा, पण अहंकाराने नाही.
अश्या या मानसिक गोंधळावर सत्य प्रकाश टाकणाऱ्या या कथा रोज एक पाहू या थोडक्यात व गुप्त अर्थ उलगडण्याचा प्रयत्न करू या

आकर्षक जाळीदार डोसा

ज्योतिर्मय साहित्य

ही एक अतिशय आकर्षक , क्रिस्पी , चमचमीत डिश आहे. दिसायला अवघड पण करायला सोपी अशी ही डीश नक्की ट्राय करा .

साहित्य :

२ वाट्या कणीक, १ वाटी कॉर्नफ्लोअर , ४ चमचे तेल, शक्यतो ओलीव्ह ऑइल असेल तर उत्तम!व चवीनुसार मिठ .

सारणाच्या भाजीसाठी साहित्य :

२ मध्यम उकडलेले बटाटे , १ कांदा मध्यम चिरलेला, १ सिमला मिरची छान बारीक चिरलेली, ४ लसूण पाकळ्या, २ मिरच्या , कोथिंबीर, २ चमचे कॉर्न किंवा मटार, १ ब्रेडचा स्लाईस किंवा अर्धी वाटी भाजलेले पातळ पोहे, चवीनुसार मीठ, तेल.

कृती :

सर्वांत आधी एका मोठ्या बाऊलमध्ये कणिक, कॉर्नफ्लोअर ,तेल आणि चवीनुसार मीठ घालून व्यवस्थीत एकत्र मिक्स करून घ्यावे . मग त्यात सावकाश पाणी घालून मिक्स करत करत गाठी होऊ न देता भज्याच्या पिठाप्रमाणे पण थोडेसे पातळसर भिजवावे . शक्य असेल तर ब्लेंडरने भरपूर फेटावे म्हणजे हलकेपणा येतो .

बटाट्याची साले काढून टिशूपेपरवर ठेवून कोरडा करावा मगच तो कुस्करून घ्यावा. ब्रेडचा स्लाईस कडा काढून बारीक कुस्करून त्यावर घालावा किंवा पोहे भाजून कुरकुरीत झाले की थोडेसे बारीक करून त्यात मिसळावेत . म्हणजे बटाट्याला सुटलेले पाणी जाऊन सारण कोरडे होईल .मग कढईमध्ये २ चमचे तेल घालून फोडणी करून त्यात कांदा गुलाबी रंगावर छान परतावा .मग त्यात सिमला मिरची व लसूण ,मिरची घालून परतावे. त्यानंतर त्यामध्ये बटाटा घालून चवीनुसार मीठ व किंचित आवडत असेल तर साखर घालून कोथिंबीर घालून परतावे. आंबटगोड आवडत असेल तर थोडा लिंबाचा रस किंवा आमचूर पावडर घालावी व छान एकत्र करून सारणाची भाजी बनवून घ्यावी.

एका छोट्या प्लास्टिकच्या बाटलीच्या झाकणाला ५..७ छिद्रे पाडावीत. मग त्यात तयार केलेले बॅटर घालावे .गॅसवर नॉनस्टिकचा तवा ठेवून तो छान गरम झाला की त्यावर पहिल्या वेळेस थोडेसे तेल लावून मग तापल्यावर पाणी शिंपडून त्यावार बाटलीतील बॅटरचा डोसा घालावा. लगेंचंच हा सुटू लागतो. आजिबात चिकटत नाही .मग त्यावर सारण घालून त्याची व्यवस्थित गुंडाळी करावी व सर्व बाजू नीट बंद होतील याची काळजी घ्यावी. याचा रोल बनवून घ्यावा .हा कुरकुरीत रोल दिसायला दोऱ्याच्या गुंडाळी सारखा सुरेख पांढराशुभ्र दिसतो.

वैशिष्टय :

हा रोल दिसायला खूपच हटके ,आकर्षक दिसतो ,टेस्टी लागतो व नाविण्यपूर्ण असल्यामुळे मोहात पाडतो.

भाजीचे सारण न बनवता नुसता सुद्धा कुरकुरीत जाळीदार बनतो त्यामुळे केचप , चटण्या बरोबर सुद्धा छान लागतो.तसेंच मांडे, फ ेण्या खातो त्याप्रमाणे पिठीसाखर, दूध, तूप घालून गोड करून खाल्ले तरीही छान लागतातच त्यावर थोडी वेलची पूड व ड्रायफ्रुटस घातले तर मग मज्जाच येते .नक्की करून पहा.कणकेचा बनवलेला असल्याने हा पौष्टिक तर आहेच,पण झटपट सुटतो,आणि टेस्टी बनतो. साधा बनवत असाल तर त्यात चवीसाठी किंचित हिंग,आणि ओवा,जिरे व कोथिंबीर,मिरची थोडे पाणी घालून वाटून ते व्यवस्थित गाळून घ्यावे व पीठ भिजवताना ते घालावे. झाल्यावर वरून आवडत असेल तर चाट मसाला,लाल तिखट भुरभूरावे.रंगीत हवा असेल तर हळद किंवा पालक प्युरी घालावी.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेमळा येथे राबवली जातेय अनोखी वाचन लेखन प्रेरणा चळवळ

ज्योतिर्मय साहित्य

सातारा : वाचन लेखन प्रेरणा चळवळ उपक्रमांतर्गत विदयार्थांच्या मनावर व बुद्धीवर वाचनाचे संस्कार व्हावेत म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेमळा ता खटाव येथे ज्येष्ठ लेखक मा शिक्षण विस्तार अधिकारी श्री सोपानजी शिंदे यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते यावेळी लेखकांनी त्यांच्या मार्गदर्शनातून मुलांना अवांतर वाचन करण्यास सांगितले तसेच कविता कथा कशा पद्धतीने लिहाव्यात ? हे सांगितले. शाळेतील पहिली ते चौथी च्या विद्यार्थांनी लेखकांना विविध प्रकारचे प्रश्न विचारून त्यांचा साहित्याचा प्रवास जाणून घेतला. मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून श्री सोपानजी शिंदे यांनी त्यांची स्वलिखित १४ पुस्तके शाळेच्या वाचनालयासाठी भेट दिली यावेळी शालेय व्यवस्थापन समिती शिंदेमळा चे अध्यक्ष श्री सदाशिवजी शिंदे मोराळे गावचे सरपंच प्रतिनिधी श्री संतोषजी शिंदे मा उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्या सौ प्रेमलाताई निकम श्री शुभम शिंदे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम सुजाता खिलारे मॅडम शिंदेमळाच्या अंगणवाडी सेविका सौ सुतार मॅडम व पालक ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री भोंगाळे सरांनी केले व उपस्थित मान्यवरांचे आभार श्रीम सुजाता खिलारे मॅडम यांनी मानले



मातृशक्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

बीड : अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था (समिती) बीड जिल्हा यांचे वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मातृशक्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे.

दिनांक ८ मार्च २०२६ रोज रविवार दुपारी ३ ते ५ या वेळेत दीनदयाल शोधसंस्थान, चक्रधर नगर बीड येथे सन्मान सोहळ्याचे आयोजन होत आहे. या कार्यक्रमास अध्यक्षा म्हणून मा. पूजाताई खडकीकर (उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बीड), प्रमुख अतिथी म्हणून मा.पूजाताई पवार (पोलीस उपअधीक्षक बीड) या लाभल्या आहेत. यावेळी बीड जिल्ह्यात विवीध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या सन्माननीय महिला मातृशक्ती यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे त्या पुढील प्रमाणे

सौ. मनिषा भाऊराव पवार (वृद्धाश्रम), सौ. उमा सुनील औटे (गोसेवा), सौ.मयुरी सुरेश राजहंस (सेवाश्रम), सौ. मुक्ता राम चौधरी (रुग्ण अन्नदान) व सौ. आशा गणेश देशपांडे (उद्योग) यावेळी

शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सोहळ्यास यावे असे आवाहन श्री.जयंतराव अकोलकर (अध्यक्ष), श्रीकृष्ण जोशी (सचिव),

श्री. मुकुंद कुलकर्णी (संघटन सचिव), सुनील मोगरकर (सहसचिव) संजय डळे (लेखन प्रमुख) सौ.वर्षाताई पसारकर, सौ. कविताताई जोशी व सर्व पदाधिकारी इ.संकलन संस्था बीड जिल्हा यांच्या वतीने करण्यात येते.

मूल मराठी लेखिका - उज्ज्वला केळकर
हिन्दी अनुवादिका - डॉ. मीना श्रीवास्तव

स्मृति का उत्तरीय

आगे.....

परिवार और नौकरी के दो पहियों पर ज़िंदगी की गाड़ी चलती रही, सिर्फ चली नहीं बल्कि, खूब तेज रफ़्तार से भागते हुए निकल पड़ी| बच्चे पैदा हुए। उन्हें क्या चाहिए और क्या नहीं, इसी चाहत के रहते मैं यह भी देखना भूल गई कि मुझे क्या चाहिए।

चालीस वर्ष की दहलीज़ पर पहुँची और और अकल्पनीय घटना हुई| वह मिला| मेरे सपनों का राजकुमार। बेहद आकर्षक और सजीला नौजवान| नीली आँखों वाला। अप्रत्याशित रूप से मेरी उससे मुलाक़ात हुई। उसकी आँखों में एक निमंत्रण था, उत्तेजना का। रंगों और रेखाओं की भाषा में बात करता था, वह एक चित्रकार था। केदार। सत्ताईस-अट्ठाईस साल का रहा होगा। उसका परिचय एक सहेली के घर हुआ| वह बातें करते करते, देखते देखते चित्र बनाता । मुझे पहले उसके चित्रों से प्यार हुआ। फिर उससे। समझ नहीं पा रही थी, मैं अपने प्रेम की भावनाओं को कैसे प्रकट करूँ? सुहास पंडित ने लिखा है, '"प्यार को शब्दों या स्पर्श की ज़रूरत नहीं होती।' लेकिन फिर वह बेचारा प्रेम अपने आप को कैसे व्यक्त करे? मैंने तो उसे अपने दिल में बिठा लिया| पर समझ नहीं पा रही थी कि, यह बात उसे कैसे बताऊँ।

एक बार मुझसे कहने लगा, "क्या अपना पोर्ट्रेट बनवाना चाहती हो?"

"मेरा? पर मैं इतनी सुंदर कहाँ हूँ?"

"तुम्हें किसने बताया कि पोर्ट्रेट बनाने के लिए खूबसूरत होना ज़रूरी है? तुम्हारी मुस्कान तो मुझे मोनालिसा जैसी लगती है।"

"तुम सचमुच ही पागल हो! कुछ भी कह देते हो!" मैं खिलखिलाकर हँस पड़ी, माधुरी दीक्षित जैसी!

"कुछ ऐसा वैसा नहीं कह रहा हूँ! सचमुच! तुम्हारा वह मुस्कुराता चेहरा मुझे रंगों से कैनवास पर ढालना है!"

क्रमश :.....



कवितेच्या लाटावर...

कवितेच्या लाटावर...

खेळ हा जन्मजन्मांतरीचा

माणसा! का न होते जीवनी तुजला रे!
जगी कधीही, कसलीही नि कुठेही रे!
तुझ्या दूष्कृत्यांची तूजला जाणीव रे!
का! न येते तुजला निसर्गाची कणव!

अतिक्रूरतेने वागतो आहेस तू निसर्गाशी
कुठे गेली तुझी माणुसकी विचार मनाशी
तुडवून पायदळी नीती का झालास अधाशी
अनीतीच्या पैशांसाठी नित करितोसी मखलाशी

जन्मलास धरेवरी तू निसर्गाच्याच कुशीत रे!
खेळूनी त्याच्याच अंगाखांद्यावर वाढलास रे!
तुझे बालपण,तरुणपण नि वृध्दपणही सारे
व्यतीत होऊनि अंती त्यातच होती लिन सारे

खेळ असतो सारा हा जन्मजन्मांतरीचा
तो कसा खेळावा कार्यभाग ज्याचात्याचा
इर्षा,द्वेष,मोह हे फल त्यागूनी खेळावा खेळ
तरीच बसेल तुमचा निसर्ग, सत्कर्मांसी मेळ

ऋषीमुनींनाही न मिळतो जन्म सहज धरेवर
इतर युगी त्यांना करावी लागते तपश्चर्या घोर!
कलियुगी इश्वरनामे सहजचि मिळते मुक्ती!
परि,बहुतांशी मानवांची भ्रष्ट झाली आहे मती

काव्यरचना: मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१

शल्य हे स्त्री मनाचे

मनाच्या गाभ्यात आहे
स्त्री आयुष्याची लक्तरे
दरबारातच हरले
द्रौपदीचे अंग वस्त्रे.....१
स्त्रीला मनुष्यत्व कधी
साधे मिळालेच नाही
स्त्रीला बंधमुक्त कधी
वागू दिलेलेच नाही.....२
द्रौपदी दरबारी ही
रडली गळा फाडून
कोणीच उठले नाही
स्वत्वाची छाती काढून.....३
कोणी कोणाचे नसते
वेळप्रसंगी संकटी
महाभारतातील ही
हेच कळले प्रसंगी.....४
पडता काम लोभही
आठवे तो क्षणोक्षणी
अधर्म घडता होई
उपेक्षा केविलवाणी.....५
द्रौपदी यांच्या भूमिका
घ्या मनी अनुकरणी
अपमान नका करू
कधी सकल दर्शनी.....६
उपहासात्मक हास्य
विनाशास निमंत्रण
अहंकारी अपमान
नसे काही नियंत्रण.....७
द्रौपदी सीता सावित्री
उर्मिला नि जिजामाता
त्यागमूर्ती तपस्विनी
पुण्यश्लोक अहिल्या माता.....८
त्याग समर्पण संस्कार
रुजवण करू जन्मभर
सद्गुणांचे आचरण
उपयोजन मणभर.....९
नकारात्मक क्षणांना
आंबड्यात गुंफुनिया
सुवासिक फुलांनी तो
सुगंधित सजवूया.....१०
महिला दिनाचा संकल्प
वाचनाने साजरा करू
थोर महिलांच्या गुणांची
उजळणी कृतीने आचरू....११

सौ.जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई



महिला दिन

दरवर्षीच येत असतो
जागतिक महिला दिन.
सर्वच जण करीत असतात उदोउदो
या दिवशी महिलांचा.
त्यांचे तोंडभरून कौतुकही
होत असते या एकाच दिवशी.
मात्र संपला हा दिवस की
सर्वच जण सारे विसरून जातात
आणि पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या'
हीच म्हण पुढे येते.
खरंच जेव्हा सर्व पुरुषांचा
महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन
असेल पवित्र
तेव्हाच खऱ्या अर्थाने होईल
जागतिक महिला दिन साजरा.

सौ. निर्मला भयवाळ
छत्रपती संभाजीनगर

तुषार अमृताचे
© हसरा चन्द्र

अंगावरी येती कधी, तुषार स्वये अमृताचे
काटाच येतो पेरुनी, बीज कोवळ्या फुलांचे.

नसतोच तसा मी तेव्हा, मासा असा राहिलेतो
उघडसाप ही खिडकीची, नाटवे उभे तनांचे

मग तेव्हा खरी वाटते, कागदी नाव आपुली
जाणते तीच ती काही, अर्थ अबोल भावनांचे

वैशाख वणवा थांबतो, येतो पाउस जरासा
अंदाजही अवचित कधी, चुकतात हवामानाचे

डोके मिटून ही बदके, जरी का अवतीभोवती
हंस तरी वेचून जाती, मोती सहज प्राणनाचे

******

खरे दुःख ..

क्रिकेट

महिलाक्रिकेट संघ
होऊ लागला सरस
पुरुष संघा बरोबरी
निर्माण तगडीचुरस

जागवे उन्मेषीउमेद
प्रसिद्धीस्तुती सुरस
प्रोत्साहन ते बोर्डाचे
वातावरणही सकस

मानधन बरोबरीनेचं
दूर भेदाभेद आकस
रसिकसंख्या वाढती
बदलतेयं जनमानस

स्पीडब्रेकर्स दुभंगले
अडथळे जुनी उग्रस
सुकर निवड प्रक्रिया
सुलभ झाली सर्कस

यावेतनवीन खेळाडू
दावे अंगिभूत साहस
पराजयानेकधीसुध्दा
नको होणे बा नर्व्हस

रसिकदादही मौलिक
अधिक वाढवे स्वारस
सोनेकरावे खेळ संधी
हाती घावलायं पारस

गति यावी रे प्रगतीला
निर्माण सशक्त वारस
लिहा अनोखेइतिहास
सांघीकभावना कोरस

हुंडाबळी का अजून
मना सतावते दुःख
शोधावे उत्तरप्रश्नांचे
व्हावे जरा अंतर्मुख

नारी प्रगती अग्रेसर
तरी कशी अधोमुख
संकट हारिणी सोसे
गं वेदना मरणोन्मुख

अडीचणीच्या समरी
असूरमर्दिनी सन्मुख
स्वतांवर येई आपत्ती
कशीहतबल विन्मुख

सुखी ठेवे परिवारांस
स्व संरक्षण परान्मुख
नारी प्रधानसंस्कृतीत
गुंजारव होई एकमुख

शेवटी तिष्ठते दीनतेने
असूनही कुटुंबप्रमुख
का लढायचे विसरली
अन्याय साहे हसमुख

नारी श्रेष्ठत्वाचा डंका
गाजू लागे चौ मुलूख
कारण कळेना मुळी
सत्तागाजवतो पुलूख

शक्ती दावेना आपली
सदैव लागते रुखरुख
जागी होगं महाकाली
पुरे आता खड्पसुख

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

स्त्री ची नऊरूपे

स्त्री ची नऊरूपे जणू दुर्गा मातेची
नऊ ऊर्जा नवरूपे प्रतीके तेजस्वितेची
जन्मदात्री ती जननी दुःखसाहिनी, सुखवाहिनी
बालरुपे देता वंशप्रजननी सार्या कुटुंबाची जननी
कन्येच्या रूपात लाघवी घराला गोकुळ भासवी
पैंजणांची छमछम तोषवी माधुर्याची गाई गोडभैरवी
लाडक्या बहिणीची माया ओवाळी प्रेमे भाऊराया
आधार तिला माहेरी या आनंदोर्मि येती हृदयी या
मैत्रीची प्रेरणा हळुवार आपुलकी निस्वार्थ अलवार
मैत्रीची बकुळपुष्पे सुगंधीहार निरपेक्ष, निस्वार्थ मदतगार
स्त्री असते जेंव्हा प्रिया ती बावरी, अनावर प्रेयसी ती
नयनी तिच्या दिसे नित प्रीती तिज ना कधी जगाचीभीती
जेंव्हा ती पत्नी होते जयाच स्वाभिमाने जपते प्रीतपतीची
राखते ती रीतभात सासरची वंशवेल बहरवते संसाराची
सून म्हणून घेता ती बावरते जबाबदारी संसाराची पडते
प्रत्येक वागण्यावर नजरअसते कर्तव्याच्या जाळ्यात अडकते
सासूपण मिरविताना मोहरते सुनेच्या चुका सहजच शोधते
घराण्याच्या चालीरिती लादते सासू होता कमीपणा न घेते
आजी बाई होता ती सावरते रागरुसवे पार पुसून टाकते
नातवंडाना प्रेमवर्षावे न्हाते वात्सल्यसिंधु सरिता होते

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
मुंबई, विरार

स्त्री...

बाल्यातील निरागसता मी
तारुण्यातील अवखळता मी...
मीच माझी सखी सख्याचीही सखी
प्रेम समर्पण आदराने होते सुखी....

नाजूकातील नाजूक फुल मी
कठोर कठीण पाषाणही मी....

प्रेमपान्हा हे अस्तित्वाचे अस्तित्व
मला पाहूनच कवींचे उफाळून येते कवित्व....

सावरणे आवरणे कर्तव्य माझे
तेच खरे कारण असतात स्वतंत्र राजे....

राणी हे राजाचे कारण असण्याचे
माझ्याशिवाय त्याचे असणे सत्य नसण्याचे....

एकमेकांची अस्मिता जपत चाले खेळ
आयुष्याचा असतो असा रंगीबेरंगी मेळ...

आहे ते सर्वोत्तम, देणे ईश्वराचे
जीवन सार्थक होते सौभाग्याचे....

अवर्णनीय आनंद शब्दांपलिकडचा
कुपीत जपावा असा सुगंध जीवनाचा.....

शब्द नव्हे हा अनुभव संचय
सार्थकता ही जणू अमृतमय...
जणू अमृतमय....

भगवंत हृदयस्थ आहे 🙏
@ अपर्णा परांजपे पुणे

अस्तित्व

वादळात असंख्य तारे
चकाकली मायेची ऊब
पंखानी तशीच साकारली
हलके हलके सोनपावली
शतदारे उघडली नवचैतन्याची

दुनियेच्या बाजारात अवघी
वृत्ती आखाडा सामन्यांची
पराक्रम गहीवरला चैतन्याचा
निळ्या निळ्या प्रकाशाभोवती

अवघे जग माझे
झाले तद्रूप संसारात
संसाराची होळी खेळतांना
माझे मीच सावरले
सागरगोट्यातील बीज

झाले आकाश मोकळे
केशसंभार सांभाळतांना
हृदयी लागली चुणूक
स्वतःच्या जाळ्यात
स्वला मशगुल करण्याची

रित्या झाल्या आठवणी
रिते झाले स्वप्न
उडले उंच उंच आकाशी
पुन्हा नव्याने स्वचे
अस्तित्व शोधण्यासाठी

प्रा. डॉ. वैशाली भांडारकर /झोडे
8380893706

रंगपंचमी...(पंचाक्षरी)

रंग सावळा
विठ्ठल माझा
मस्त देखणी
अशी रुक्मिणी....।।

कृष्ण रंगात
कृष्ण मुरारी
राधा भाभडी
ती वृंदावनी....।।

निर्मळ रंगी
राम देखणा
घेई उखाणा
सीता लाजरी...।।

रंग भगवा
नृसिंह उभा
प्रकटे स्तंभी
लक्ष्मी जवळी....।।

हळदी रंगी
दंग मल्हारी
सखी म्हाळसा
बाणू जेजुरी.....।।

विविध रंग
मनी तरंग
हर्ष उल्हास
सखीच्या मनी.....।।

धावे लावण्या
रंग मजला
लाजे सजणी
नवखी जशी.....।।

©®दत्ता तरळगट्टी
९८८१६२९०४८ पंढरपूर

* माय झालर झावळ

माय झालर झावळ तिनं गाठली सत्तरी देत
जीवाला झालर कधी मायेची झावळ मनी
मवाळ मवाळ...।।

शोभे जरतारी इरकल हिरव्या दगडी रंगात
ढळला ना कधी पदर त्यानं वाढला आदर
माय लय मवाळ मवाळ...।।

सोन्या रुप्याचा घरी मोह धरला ना कधी
गळा पोत नाकी नथ नित्य सौदर्याचा
उत्सव अशी माय देखणी देखणी..।।

त्या चेहऱ्याच्या सुरकुत्या कष्टाच्या जणू
पावत्या त्या कष्टानं फुलविला धन्यासह
कुटुंब मळा कंठी कोकिला कोकिळा..।।

तिचा कुंकवाचा टिळा उगवतीचा रवि
भाळी माझ्या सुखाच्या संसारा तुझ्या
नामाची पुण्याई अशी माय झालर
झावळ...!

अशी माय झालर झावळ....।।

दत्ता तरलगट्टी सर पंढरपर.

वीरांगना हवी

असावी घरोघरी एक वीरांगना
झाशीच्या राणीची छबी व्हावी
अज्ञानतमा मिटवे जिचा प्रकाश
अशी एक तरी पणती हवी..!

कन्या म्हणजे नवचैतन्य
जशी ज्योत मंद तेवत
उत्साहाची न्यारी किलबिल
तिच्याठायी शक्ती दैवत...!

लाचार, अबला, परावलंबी
प्रतिमा डागाळलेली स्त्रीची
रडकी ओळख तिने पुसावी
बुद्धीस यावी धार विद्येची..!

हृदयी जिच्या उपजत सहज
माया,ममता,प्रेमभाव
नव्या पिढीस देई संस्कार
परि,शक्तीचा नसे अहंभाव..!

कन्या अशी सुलक्षणी
देशासाठी कर्तव्यबद्ध
जन्मदाते होती कृतकृत्य
कर्तृत्वाने जी स्वयंसिद्ध...!

सौ.नीलिमा मकरंद बोकील,
पुणे... भ्र.ध्वनी:९४२०४९५४७

जागतिक महिला दिन

म्हणू नका अबला,
तिला काय येत?
आकाशात पाऊल
तिच उमटत,,!! १।।
म्हणू नका बावळट
तिला काय कळतं?
ऑपरेशन ती करते
जग डॉक्टर तिला म्हणतं ,,।।२।।
म्हणू नका वेडी
काय खर आहे तिचं ?
तिच्यामुळेच आहे
अस्तित्व समाजाचं ,।।३।।
नका मारू टोमणे
करू नका अपमान
देवीची करून पुजा
महिलांचा करा सन्मान,,।।४।।
आई, मुलगी, बायको
बहीण, मैत्रिण, सहकारी
शक्तीचीच रुपे आहेत
घरी आणि दारी,।।५।।

©®©®
सौ .मनोरमा भारत बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

ती...

ती आहे म्हणून आई आहे
ती आहे म्हणून जग आहे
ती घरात नसते तेव्हा
श्रीमंत ही गरीब आहे

ती आहे म्हणून पत्नी आहे
ती आहे म्हणून चूल पेटत आहे
ती दुःखी असते तेव्हा
धन, संपत्ती ही व्यर्थ आहे

ती आहे म्हणून लेक आहे
ती आहे म्हणून अंगणाची शोभा आहे
ती सासरी निघून जाते तेव्हा
तिच्याशिवाय कोणाला काळजी आहे. ..?

ती आहे म्हणून बहीण आहे
ती आहे म्हणून हाताला राखी आहे
ती,नकोशी का वाटते..?
तिच्याविना हात सुना आहे

ती आहे म्हणून आजी आहे
ती आहे म्हणून जुनी संस्कृती आहे
ती घरातून निघून जाते तेव्हा
आजी विना घर आनंदीत आहे. ..?

ती आहे जगातील उंच शिखर
तिच्यात आहे प्रेम, जिव्हाळा
तीच नको वाटत असेल तर
कोण लावणार आपुलकीचा लळा

तीच या जगात नसेल तर..
एवढे नाते कोण निभावणार..?
आतातरी थांबवा हो भ्रूणहत्या
तिच्या डोळ्यातून वाहते अश्रूंची धार

सौ.संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
७८२१८१६४८५

ती.....!

तु लक्ष्मी, तु जननी,
तु दुर्गा, तु सहचारणी!
आदीशक्तीचे रूप तु,
प्रेम,आधार,काळजी तु!
सारेच जाणतात स्त्रीला,
तिच्यातील मायभवानीला!
परी सन्मान करणे स्त्रीचा,
हा विषयच संस्काराचा!
साऱ्यांना जमणे नाही,
फळेच नासकी काही!
अपमान तिचा करण्यात,
सुखावती कुणीमनात!
कमीपणा तिला देऊन,
घेतात काही जण मान!
दाबुन ठेवती म्हणुन,
मुलगी, बायको, सुन!
नसे जाण तिच्या शक्तीची,
ती तर लेक सरस्वतीची !
सांभाळेल विश्वाचा पसारा,
तीनेच घडविले हर कुमारा!
दिला मडक्याला आकार,
झालास तु मग साकार!
अन् कुणा म्हणतोस तु,
काम नाही हे बाईचे?
त्या प्रत्येक वेळी हिणवतो,
कर्तुत्व तुझ्या ही आईचे!
असो, स्त्री जन्माची कथा,
असती अनंत गं व्यथा...
पण ती प्रेमा पुढे झुकते,
थांबते,दुबळत्वं स्वीकारते !!

सौ.प्रियंका गौरव जावळे.
संभाजीनगर.
© priyagaurav.



हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

''कांही हवे असेल तर त्याआधी कांही द्यावे लागेल''

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार प्रिय मैत्रांनो !

''मी एकटी जग बदलू शकत नाही, पण मी पाण्यात दगड टाकून अनेक लाटा निर्माण करू शकते.'' – मदर तेरेसा

८ मार्च या अंतर्राष्ट्रीय महिलादिनानिमित्य अभिनंदन आणि शुभेच्छा !

मंडळी महिलादिनाचा इतिहास थोडक्यात जाणून घेऊ या. अमेरिका आणि युरोपसहित जवळजवळ संपूर्ण जगातील स्त्रियांना २० व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. १९०७ साली स्टटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली. त्यात क्लारा झेटकिन या कम्युनिस्ट कार्यकर्तीने ''सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे'', अशी घोषणा केली. ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड निदर्शने केली. त्यात दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या प्रमुख मागण्या होत्या. सोबतच लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक स्तरावर समानता आणि सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क हे देखील मुद्दे होते. १९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत ८ मार्च १९०८ रोजी या अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा ''जागतिक महिला-दिन'' म्हणून स्वीकारावा असा क्लाराने मांडलेला ठराव मंजूर झाला. नंतर युरोप, अमेरिका आणि इतर देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून इंग्लंड येथे १९१८ साली आणि अमेरिकेत १९१९ साली या मागण्यांना यश मिळाले. भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. पुढे १९७५ हे वर्ष युनोने ''जागतिक महिला वर्ष'' म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्री संघटनांना बळकटी आली. जसजसे बदलत्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या.

मतदानाचा हक्क महत्त्वाचाच मंडळी, पण त्या योगे स्त्री स्वतंत्र झाली असे समजायचे कां? तो तर दर पाच वर्षांनी मिळणारा अधिकार आहे. स्त्रीला घरात आपले मत मांडण्याचा अधिकार आहे का? बरे, मांडले तरी ते विचारात घेतल्या जाते कां? हे सुद्धा बघायला नको कां? अगदी साडी खरेदी करायची असेल तर आर्थिक स्वातंत्र्य आहे कां, अन ते असले तरी स्वतःच्या पसंतीची साडी घेता येते कां? मंडळी, प्रश्न साधा आहे पण उत्तर तितके सोपे आहे कां? स्त्री सक्षमीकरण आणि



तिच्या शैक्षणिक अर्हतेशी समांतर असलेले आर्थिक स्वातंत्र्य यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. किंबहुना तिच्या सक्षमीकरणासाठी योग्य शिक्षणाधारित आर्थिक उत्पन्न हे सर्वाधिक महत्वाचे आहे. इथे महत्वाचा मुद्दा स्त्रीसाक्षरतेचा आहे. ही संकल्पना आज देखील कधी नव्हे इतकी प्रासंगिक आणि समर्पक वाटते. मी २०२२ साली मेघालयाचा प्रवास केला, त्यातील प्रामुख्याने जी गोष्ट मला जाणवली ती सर्वांगाने दृश्यमान होणारे स्त्री स्वातंत्र्य. तेथे देखील या स्त्री स्वातंत्र्यसूर्याच्या उदयाला कारणीभूत आहे स्त्रियांची संपूर्ण साक्षरता आणि मातृसत्ताक पद्धतीमुळे गावलेली आर्थिक सुबत्ता! याच्या परिणामस्वरूप तेथे स्त्री-शक्तीचे अद्भुत रूप मी ठायी ठायी अनुभवले.

यंदाच्या ८ मार्च या जागतिक महिला दिन या विशेष दिनानिमित्य २०२६ ची थीम अतिशय बोलकी आणि आकर्षक आहे. या थीमचा प्रमुख संदेश आहे: ''गिव्ह टू गेन'' अर्थात ''कांही हवे असेल तर त्याआधी कांही द्यावे लागेल.'' सकारात्मक दृष्टिकोनातून बघितल्यास हा जो देणे - घेणे नामक उपक्रम आहे त्यात महिला सक्षमीकरण महत्वाचे पुढचे पाऊल आहे. हे प्रारूप मांडणारे विचारवंत म्हणतात, ''ही वजाबाकी नसून प्रगतीचा हेतुपुरस्सर जोडलेला गुणाकार आहे.'' मला एक भविष्यकालीन आकडेवारी अचंभित करून गेली. २०२५ पर्यंत जागतिक लोकसंख्या पुरुषांना थोडे झुकते माप देत आली आहे, दर १०० महिलांमागे अंदाजे १०१ ते १०२ पुरुष (अंदाजे ५०.३% पुरुष: ४९.७% महिला) असे! मुले जन्माला येत असताना (१०० मुलींमागे अंदाजे १०६ मुले) असा मामला असूनही पुरुषांमध्ये मृत्युदर अधिक आहे. त्यामुळे वृद्ध वयोगटात महिलांची संख्या समान किंवा अधिक आहे. त्यामुळेच जागतिक स्तरावर २०५० पर्यंत स्त्री-पुरुष प्रमाण समसमान होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

डॉ. मीना श्रीवास्तव
ठाणे (पश्चिम)
भ्रमणध्वनी - ९९२०१६७२११

संपत्ती ही मर्यादित नसून ती नवनिर्मित केली जाऊ शकते. एकाची गरिबी दूर करण्यासाठी दुसऱ्याला गरीब बनवण्याची गरज नाही, तर संधी, शिक्षण आणि कौशल्याच्या माध्यमातून गरिबांना सक्षम करणे आवश्यक आहे. हे प्रमेय मांडण्याचे कारण विद्यमान लाडकी बहीण योजना व तत्सम रेवडी वाटणाऱ्या तथाकथित समाजकल्याण योजना! इथे संपत्ती फक्त एकाकडून दुसऱ्याकडे हस्तांतरित होत नाही तर अमक्याच्या खिशातून निधी घेत (तो आपणच देतोय असे भासवत) तमक्याला कांही क्षणांकरता आभासी श्रीमंत बनवण्याची कला मते उकळण्यापलीकडे कांहीही साध्य न करता केवळ समस्या हस्तांतरित करण्याचे उथळ साधन आहे. याउलट उद्योग, नाविन्य आणि गुंतवणुकीतून नवीन संपत्ती निर्माण होते, ज्यामुळे सर्वांचे जीवनमान सुधारू शकते. स्त्रियांचा स्वयंरोजगार म्हणजेच त्यांना स्वयंसिद्धा बनवण्याचा प्रयत्न वर निर्देशित तात्पुरत्या योजनांपेक्षा कित्येक पटीने कल्याणकारी आहे. एकल किंवा एकत्रितपणे, जमेल तसे आंगिक, कार्यिक आणि सामाजिक दान देणे म्हणजे लिंग समानता निर्माण करण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांना मदत करणे हे प्रत्येक नागरिकाचे आणि नागरिक गटाचे कर्तव्य आहे. आपल्या देशाची लोकसंख्या बघता सरकारी आणि गैरसरकारी यंत्रणा निश्चितच अपुऱ्या आहेत. एकच उदाहरण द्यायचे तर गरीब मुलींची शैक्षणिक जबाबदारी घेणे, याला आपण खारीचा वाटा म्हणू या. पण दात्यांची संख्या असंख्य असेल तर हा स्त्री-विकासाचा सेतू बांधणे शक्य आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या अवाढव्य लोकसंख्येबाबत सकारात्मक आणि विकासाभिमुख दृष्टिकोन मांडला होता. ते म्हणत, ''भारताची लोकसंख्या ही केवळ समस्या नसून ती एक शक्ती आणि संपत्ती देखील आहे.'' म्हणूनच आपल्या दात्यांचे संख्याबळ हीच आपली ताकद आहे.

जेव्हा आपण कांही देतो, तेव्हा त्याचा आपल्याला नक्कीच फायदा होतो. स्त्री सक्षमीकरणाने निव्वळ तिचाच नव्हे तर सर्वांगाने राष्ट्राचा फायदा होणार आहे. ''गिव्ह टू गेन'' चा खरा आश्वासक संदेश हाच आहे. शिक्षित स्त्री ही एक सशक्त कुटुंबाचा, समाजाचा आणि राष्ट्राचा आधारस्तंभ आहे. यात चूल आणि मूलच्या पल्याड जाऊन ती जेथे पाऊल ठेवेल ते तिचे कार्यक्षेत्र असायला हवे. नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी तिची ऊर्जा कार्यान्वित व्हायला हवी. आधुनिक काळात विविध क्षेत्रातील महिलांचे नेतृत्व वाढवणे आणि त्यांच्यातील कौशल्यांचा विकास करणे हे लैंगिक समानता आणि शाश्वत प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

''आपल्या जगाचे रूपांतर करण्यासाठी आपल्याला जादूची गरज नाही. आपल्याला आवश्यक असलेली सर्व शक्ती आपण आधीच स्वतःमध्ये बाळगतो.'' – जे के रोलिंग.

सक्षम नारी आज आणि काल

ज्योतिर्मय साहित्य

१९०८ साली न्यूयॉर्क सिटी येथे हजारो महिलांनी चांगले वेतन, कामाचे कमी तास आणि मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून आंदोलन केले होते. तसेच रशियामध्ये १९१७ साली मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून स्त्रियांचे आंदोलन झाले, तो दिवस आठ मार्च होता. १९७५ ला युनायटेड नेशन ने ८ मार्चला अधिकृतपणे ''जागतिक महिला दिन'' म्हणून मान्यता दिली. हा दिवस महिलांच्या कर्तुत्वाचा सन्मान करण्यासाठी तसेच स्त्री सशक्तिकरणाचा संदेश देण्यासाठी आपण साजरा करतो. म्हणूनच आज मनात आले की सशक्त नारी बद्दल काही लिहावे. नारी मग ती आजची असो की भूतकाळातील, तिच्यावर कितीही चिंतन- मंथन झाले तरी ते थोडेच आहे.

आज असे एकही क्षेत्र नाही की जे स्त्रीने व्यापले नाही. आपण पूर्वी म्हणत होतो, '' जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी'' ही म्हण आता अर्धसत्य झाली आहे.कारण जगाचा उद्धार तर ती करतच आहे, पण तिचे दोन हात जे पाळण्याची दोरी धरून होते, त्या हातात आता पेन आला आहे, खडू आला, रेफरीची शिट्टी आली, शिक्षणाची डिग्री आली, पदाची पॉवर आली, स्कुटी पासून तर विमानापर्यंत सर्व स्टेरिंग आलेत. घरातला झाडू,लाटणं आणि बाळाच्या पाळण्याची दोरी, हे तर तिच्या हातात आहेच. पण ती घर सांभाळून बाहेर करिअर सुद्धा सांभाळत आहे. घरातील जबाबदारी आता फक्त सून, पत्नी, आई, बहीण ही नाती सांभाळण्यापूर्ती मर्यादित राहिली नाही तर तीआज घरातील आजारी लोकांची डॉक्टर आहे, आवडीचा स्वयंपाक करून सर्वांना तृप्त करणारी कुक आहे, मुलांना समजावणारी कौन्सिलर आहे, अभ्यास घेणारी टीचर आहे, आणि वेळ पडली तर या सर्वांना धारेवर धरणारी कडक शिपाई सुद्धा आहे. ती शांत असते तोपर्यंत सर्व ठीक आहे.पण तिच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला तर मात्र ती आक्रमक बनते .मग ती आपल्या निर्णयापासून परावृत्त होत नाही, आणि स्वतःवर झालेला अन्याय सहन करत नाही.

नारी ही आज शिक्षणाने अधिक सक्षम झाली आहे. माझी आई मला लहानपणी सांगायची की इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तेव्हा एक वाक्य नेहमी कानावर पडायचं ''आता काय, बायांचे राज्य आलं बुवा!'' पण एवढ्या पुरुषांना मागे टाकत इंदिराजी पंतप्रधान बनल्या, म्हणजे त्या सक्षम होत्या म्हणूनच ना? स्त्रियांच्या बाबतीत अतिशय मागासल्या विचाराच्या देशातील बेनझीर भुत्तो सारखी महिला पंतप्रधान झाली ती कणखर आणि सक्षम होती म्हणूनच ना?

हे उदाहरण तर अगदी अलीकडील काळातील आहेत. पण सीतेपासून तर द्रौपदीपर्यंत ज्या इतिहासात स्त्रिया होऊन गेल्या, त्या स्वाभिमानी होत्या. म्हणूनच रामाने घरी चल म्हटले तरी दुखावलेली, स्वाभिमानी सीता ही घरी न जाता धरतीत सामावली. द्रौपदीने आपला अपमान सहन केला नाही तर तो व्यक्त केला. लोक म्हणतात बाई मुळे रामायण महाभारत घडले. मी म्हणेन तिच्या अस्मितेला धक्का लागला म्हणून रामायण महाभारत घडले. पूर्वीपासूनच स्त्री सक्षम असल्याचे पुरावे पहायला मिळतात. कारण सीतेने आपल्या चारित्र्याचे पावित्र्य राखले म्हणूनच रामायण घडले, आणि द्रौपदीने आपला झालेला अपमान मुकाट्याने गिळला असता किंवा प्रतिशोधाची ज्वाला जिवंत ठेवली नसती तर महाभारतही कदाचित झाले नसते.

अर्चना ठाकरे मोरे
मूर्तिजापूर मो.96374 29655

अगदी मध्ययुगीन इतिहास पाहिला तर शूरवीर मराठे सरदार मुघलांची चाकरी करत होते. वाघासारखे माणसं पण स्वतःची शक्ती दुसऱ्यासाठी वापरत होते. मात्र स्वराज्याचे स्वप्न एका स्त्रीच्याच डोळ्यांनी पाहिले, आणि ती म्हणजे आपली महाराष्ट्राची माय जिजाबाई! तिने आपल्या मुलाच्या मनात स्वराज्याची ज्योत नव्हे तर मशाल जागवली असे म्हणावे लागेल.

चारी बाजूंनी प्रखर विरोध होत असताना सावित्रीबाईंनी आपला लढा अतिशय सक्षमपणे दिला आणि स्त्रियांच्या पदरात शिक्षणासोबतच सन्मान, आत्मनिर्भरता, स्वातंत्र्य, स्वाभिमान हे सगळेच टाकले.

हे झाले आपल्या सामान्य माणसाचे! पण देवतांमध्ये सुद्धा आपण म्हणतो, ''गणपती आपला साधा आहे बाई! शंकरजी ही आपले भोळे, पण देवी-महालक्ष्मी यांची पूजा कठीणच! खूप नियमानं करावं लागतं बाई सगळं!'' मला तर यातूनही नारी शक्ती दिसते. दहा हात मग ते देवीचे असो की स्त्रीचे! तिच्यावर किती जबाबदाऱ्या आहेत याचे ते प्रतीक आहे आणि त्यात ती कुठेही कमी पडत नाही.

ती वैज्ञानिक आहे, डॉक्टर आहे, इंजिनियर आहे,समाजसेविका सुद्धा आहे, खेळाडू आहे, मंत्री आहे,ती बॉक्सर आहे, वैमानिक आहे, ती सर्वच आहे.

ती स्वयंपाक करते, ती शिकवते, ती खेळते,ती समुद्रात पोहोचते, ती गाणं म्हणते, ती कुस्ती खेळते, ती धावते, ती भाषण देते, ती देश चालवते, ती सर्वच करते.

पण हे सगळं असलं तरी आज आपल्या स्त्रियांवर एक आरोप लावल्या जातो तो म्हणजे स्त्रीच स्त्रीची वैरी आहे. आणि हा आरोप काही अंशी खरा आहे असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. म्हणजे घरात सुनेचा छळ करणारी सासू, वहिनीचा हेवा करणारी ननंद, एकमेकिंची चुगली करणाऱ्या जावा, ह्या बायकाच आहेत.आपण शिकलो,जागृत झालो. त्यासाठी माय सावित्रीने आपल्यासाठी नाना कष्ट सहन केलेत. त्याची थोडी जाण ठेवूया. आज आपण एकमेकींना आधार देऊया, एकमेकींची हिम्मत वाढवूया, बस मध्ये जागा देण्यापासून तर ऑफिसमध्ये प्रमोशन मिळण्या पर्यंत एकमेकींना सहकार्य करूया,मैत्री भाव जागृत करूया!आपण ही सुरुवात घरापासून करूया. घरातील कामवालीला सन्मान पूर्वक वागवूया, तिचा भक्कम आधार बनूया. सासूबाईमध्ये आई पाहूया, ननंदेशी मैत्रीचा हात पुढे करूया,जावेशी स्पर्धा न करता जुळवून घेऊया, मग घराचेच काय समाजाचे नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही. एका सक्षम स्त्रीने एका असहाय्य स्त्रीला मदत केली तर महिला दिन साजरा होईल, असे मला वाटते.म्हणून प्रत्येक खंबीर - सक्षम स्त्रीने एक निराधार स्त्री दत्तक घ्या.तिला खंबीर बनवण्याचा विडा उचला. तिला प्रगत करण्याचे प्रयत्न करा.आणि हा वारसा असाच पुढे नेण्यासाठी तिलाही प्रेरित करा.आपलं दायित्व पूर्ण करा आणि महिला असण्याचा सार्थ अभिमान बाळगा. माझ्या सर्व प्रिय माता - भगिनींना महिला दिनाच्या खूप खूप शुभेच्छा.

***

१७ एप्रिलला सिनेमागृहांमध्ये येणार लाडकी बहीण

ज्योतिर्मय साहित्य

काही चित्रपट घोषणेपासूनच रसिकांच्या मनात कुतूहल जागविण्याचे काम करतात. समाजात घडणाऱ्या घटनांवर वेध घेत, त्यावर भाष्य करणाऱ्या अशाच एका चित्रपटाची सिनेसृष्टीपासून रसिकांपर्यंत सर्वच ठिकाणी जोरदार चर्चा आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने सुरू केलेल्या बहुचर्चित लाडकी बहिण योजनेचे समाजात विविध प्रकारे पडसाद उमटले. सरकारी योजनेतील लाडकी बहीण चहूबाजूला चर्चेचा विषय ठरली. आता हिच लाडकी बहीण रुपेरी पडद्यावरही झळकणार आहे. १५०० रुपये हप्ता आमच्या संसारात लाखापेक्षा भारी असे म्हणत लाडकी बहीण हा आगामी चित्रपट १७ एप्रिल रोजी महाराष्ट्रभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

शुभम फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत लाडकी बहीण चित्रपटाच्या दिग्दर्शिका शितल शिंदे असून, त्यांनी शनिदेव फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मितीही केली आहे. या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद गणेश शिंदे यांनी लिहिले आहेत. बाबासाहेब पाटील या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते आहेत. लेखक प्रताप गंगावणे चित्रपटाचे मार्गदर्शक असून, शेखर मते, पंकज चव्हाण, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, लहू साळुंखे यांचे लाडकी बहीणला विशेष सहकार्य लाभले आहे. चित्रपटाचे लाडकी बहीण हे शीर्षक खूप विचार करायला लावणारे आहे. या चित्रपटात काय पाहायला मिळणार याचे संकेत पोस्टरवर दिलेल्या टॅगलाईनवरून मिळतात. हा चित्रपट फक्त शासकीय योजनेवर भाष्य करणारा आहे की, यात आणखी काही नाट्यमय घडामोडी दडलेल्या आहेत याबाबतही कुतूहल वाटते. या चित्रपटात स्मिता तांबे मुख्य भूमिकेत झळकणार असून, तिच्या जोडीला सुरेखा कुडची, उषा नाडकर्णी, उषा नाईक, गौतमी पाटील, रुक्मिणी सुतार (सरू आजी), सारिका जाधव, पूनम कापसे, माधव अभ्यंकर, शशांक शेंडे, अनिल नगरकर, सुरेश विशावकर्मा, सिद्धेश्वर झाडबुके, गणेश शिंदे, दर्शना जोकरे, मेगा शिंदे आदी कलाकार आहेत. एखादी सरकारी योजना सर्वसामान्य गृहिणीच्या संसाराला कशा प्रकारे हातभार लावू शकते याचे चित्रण या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. एकमेकां साह्य करू अवघे धरू सुपंथ... या उक्तीचा अवलंब करीत गोरगरीब महिला एकत्र येतात आणि कशा प्रकारे आपला उत्कर्ष साधतात हा एक महत्त्वपूर्ण पैलू लाडकी बहीणमध्ये आहे. सरकारी कार्यालयांपासून सर्वसामान्यांच्या घरांपर्यंत सर्वत्र चर्चेचा विषय ठरलेला एक महत्त्वपूर्ण विषय हसत-खेळत या चित्रपटात मांडण्यात आला आहे. आशयघन गोष्ट, उत्कंठावर्धक घडामोडी, सर्वसामान्यांच्या भावना, सुमधुर गीत-संगीत, बहारदार नृत्य, लक्षवेधी अभिनय आणि एक सशक्त संदेश देत हा चित्रपट संपूर्ण कुटुंबाचे परिपूर्ण मनोरंजन करेल असा ठाम विश्वास दिग्दर्शक शितल शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

सामाजिक विषयावर विनोदी अंगाने भाष्य करताना विषयातील गांभीर्य कायम राखण्याचे काम लाडकी बहीण चित्रपटात करण्यात आले आहे. मराठीतील नामवंत कलाकारांचा अभिनय रसिकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारा ठरणार असून, लावणी क्वीन गौतमी पाटीलची गवळण रसिकांवर मोहिनी घालणार आहे.

चिनू चेतन यांनी या चित्रपटातील गीतांची कोरिओग्राफी केली असून, संगीत विनीत देशपांडे यांनी दिले आहे. बाबा लाड, चैतन्य साळुंखे यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, गायक-संगीतकार उमेश गवळी. तसेच आनंद शिंदे व गायत्री शेलार यांच्या आवाजात लाडकी बहीणमधील गाणी संगीतबद्ध करण्यात आली आहेत.

***

अंधाराशी झुंजणाऱ्या 'विद्युलता' : विद्युत क्षेत्रातील स्त्रीशक्तीचा तेजस्वी प्रवास

ज्योतिर्मय साहित्य

आजचे जग हे प्रगती, तंत्रज्ञान आणि वेगवान विकासाचे युग आहे. एकेकाळी मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये अन्न, वस्त्र आणि निवारा यांचा समावेश होता; परंतु आजच्या आधुनिक जीवनात वीज ही चौथी अत्यावश्यक गरज बनली आहे. घरातील दिव्यापासून ते रुग्णालयातील जीवनरक्षक ऑपरेशन थिएटरपर्यंत, शेतातील पाणी उपसणाऱ्या पंपापासून ते उद्योगधंद्यांच्या चाकांपर्यंत – प्रत्येक ठिकाणी विजेचे अस्तित्व अपरिहार्य आहे. या विजेच्या अखंड आणि सुरळीत पुरवठ्यावरच आजच्या समाजाचा विकास आणि दैनंदिन जीवन अवलंबून आहे.

परंतु हा प्रकाश टिकवून ठेवण्यासाठी पडद्यामागे अनेक अदृश्य हात अहोरात्र झटत असतात. विद्युत क्षेत्रातील अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी रात्रंदिवस सतर्क राहून आपले कर्तव्य पार पाडत असतात. विशेषतः या क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे योगदान आज अधिक उल्लेखनीय ठरत आहे. एकेकाळी पुरुषांची मक्तेदारी मानल्या जाणाऱ्या या तांत्रिक क्षेत्रात आज महिलांनी केवळ प्रवेशच केला नाही, तर आपल्या कर्तृत्वाने आणि धैर्याने उंच भरारी घेतली आहे.

विद्युत क्षेत्र हे अत्यंत जोखमीचे आणि आव्हानात्मक क्षेत्र आहे. येथे अनेकदा 'लाईव्ह लाईन'वर काम करावे लागते, जिथे एका क्षणाची चूकही जीवावर बेतू शकते. उपकेंद्रातील काम असो, टॉवर लाईनची तपासणी असो किंवा अचानक उद्भवलेल्या तांत्रिक बिघाडाचे निराकरण असो – प्रत्येक कामामध्ये धैर्य, कौशल्य आणि अत्यंत सतर्कतेची गरज असते. अशा परिस्थितीतही अनेक महिला अभियंते आणि विद्युत कर्मचारी तळहातावर शिर घेऊन कर्तव्य बजावत असतात.

इमर्जन्सी ड्युटीला येथे वेळेचे कोणतेही बंधन नसते. मध्यरात्री फोन आला तरी कामासाठी सज्ज व्हावे लागते; वादळी पाऊस, अंधारी रात्र किंवा प्रखर उन्हाळा – परिस्थिती कोणतीही असो, वीजपुरवठा सुरळीत राहावा यासाठी या महिला सतत जागरूक असतात. समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी त्या अनेकदा स्वतःच्या सुरक्षिततेकडेही दुर्लक्ष करून काम करतात.

विशेष म्हणजे, समाजातील प्रत्येक घर उजळून निघावे म्हणून काम करणाऱ्या या स्त्रियांना

अनेकदा स्वतःच्या आयुष्यातील आनंदाचे क्षण त्यागावे लागतात. दिवाळी, दसरा, गणेशोत्सव किंवा इतर सण-उत्सव असताना बहुतेक लोक आपल्या कुटुंबासोबत आनंदाने वेळ घालवत असतात; परंतु विद्युत क्षेत्रातील महिला कर्मचारी मात्र उपकेंद्रात 'हाय अलर्ट'वर बसून वीजपुरवठा सुरळीत राहावा यासाठी सतर्क असतात. प्रत्येक घरात दिवा पेटावा, सणासुदीच्या आनंदात अंधाराचा अडथळा येऊ नये, यासाठी त्या स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहून कर्तव्य पार पाडतात. त्यांचे हे मौन बलिदान समाजाच्या नजरेत क्वचितच येते.

पावसाळ्यात जेव्हा वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि नैसर्गिक अडचणींमुळे वीजपुरवठा खंडित होतो, तेव्हा लोकांची नाराजी व्यक्त होते. सोशल मीडियावर किंवा वर्तमानपत्रांमध्ये ''पाऊस आला की लाईट गेली'' अशा आशयाच्या बातम्याही झळकतात. परंतु त्याच वेळी पावसात भिजत, ओल्या खांबावर किंवा उंच टॉवरवर चढून विजेच्या तारा दुरुस्त करणारे विद्युत कर्मचारी मात्र कोणालाच दिसत नाहीत. गुडघाभर पाण्यात उभे राहून, जीवाची पर्वा न करता वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी झटणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे कष्ट समाजापर्यंत क्वचितच पोहोचतात.

सीमा गाडेकर
उपकार्यकारी अभियंता, महापारेषण
छत्रपती संभाजीनगर मो. 9423172305

आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण पाहतो की स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. इतिहासात सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई आणि जिजाऊ यांसारख्या महान स्त्रियांनी समाजाला दिशा दिली आणि स्त्रीशक्तीचा अद्वितीय आदर्श निर्माण केला. त्यांच्या प्रेरणेने आजची स्त्री राष्ट्रपती पदापासून ते अंतराळापर्यंत पोहोचली आहे. खेळ, विज्ञान, प्रशासन, तंत्रज्ञान – प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपले स्थान निर्माण केले आहे.

त्याचप्रमाणे विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या आम्हा महिला अभियंत्यांनाही जेव्हा उपकेंद्रांना जोडणाऱ्या व दूरवर पसरलेले टॉवर लाईनचे विस्तीर्ण जाळे दिसते, तेव्हा आमचे मन अभिमानाने भरून येते. कारण त्या जाळ्याद्वारे हजारो घरांमध्ये प्रकाश पोहोचतो, उद्योगधंद्यांना ऊर्जा मिळते आणि देशाच्या प्रगतीला गती मिळते. या विकासाच्या प्रवासात आपलाही एक छोटासा खारीचा पण महत्त्वाचा वाटा आहे, ही भावना आम्हाला अधिक प्रेरणा देते.

खरं तर विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या या सर्व महिला म्हणजे अतिउच्च दाबात कार्य करणाऱ्या खऱ्या अर्थाने 'विद्युलता' आहेत. त्या केवळ कर्मचारी नाहीत, तर समाजाला प्रकाश देणाऱ्या विजेच्या खऱ्या दूत आहेत. अंधाराशी लढत, संकटांना सामोरे जात, त्या समाजाच्या जीवनात प्रकाशाचा दीप प्रज्वलित ठेवतात.

विद्युत क्षेत्रातील आव्हानांना आपल्या जिद्दीने पेलणाऱ्या आणि जनजीवन अखंडितपणे प्रवाही ठेवणाऱ्या प्रत्येक शक्ती रूपाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. केवळ घराघरातील दिवेच नव्हे, तर आपल्या कतृत्वाने प्रगतीचे मार्ग उजळणाऱ्या सर्व महिला विद्युत योद्ध्यांना जागतिक महिला दिनानिमित्त माझा मानाचा मुजरा!''

संकटांच्या वादळातही ती दीपस्तंभ बनते,
लाईव्ह लाईनवर धैर्याने कर्तव्य निभावते।
स्वतःच्या आनंदाचा त्याग करून उजेड वाटते,
विद्युत क्षेत्रातील ही नारी – देशाची विद्युलता ठरते।।

***

'स्त्री-पुरुष तुलना' आणि ताराबाई शिंदे

ज्योतिर्मय साहित्य

निवेदन आदरणीय स्व. रा. रं. बोराडे यांचे आहे.

संशोधक स. ग. मालशे यांनी ताराबाई शिंदे यांचे स्त्री पुरुष तुलना ही सडेतोड, पुरोगामी विचारांची निर्भीड साहित्य कृती शोधल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

स्त्रीस्वातंत्र्याचा विचार : दरवर्षी ८ मार्च रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश स्त्रियांचे समाजातील योगदान अधोरेखित करणे, त्यांच्या अधिकारांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणे हा आहे. परंतु स्त्रियांच्या समानतेसाठीचा संघर्ष हा आजचा नाही. अनेक वर्षांपासून स्त्रियांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला आहे. महाराष्ट्रातही समाजसुधारणेच्या चळवळीत अनेक विचारवंतांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी कार्य केले. त्यामध्ये ताराबाई शिंदे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी लिहिलेल्या स्त्रीपुरुष तुलना या ग्रंथातून समाजातील स्त्री-पुरुष असमानतेवर परखड भाष्य केले आहे.

ताराबाई शिंदे यांचे जीवन आणि विचार

ताराबाई शिंदे या १९व्या शतकातील प्रगत विचारांच्या मराठी लेखिका आणि समाजचिंतक होत्या. त्या अशा काळात जगल्या, जेव्हा स्त्रियांना शिक्षणाची संधी अत्यंत कमी होती आणि समाजातील बहुतांश स्त्रिया परंपरा आणि बंधनांच्या चौकटीत अडकलेल्या होत्या. स्त्रीला घराच्या मर्यादेत ठेवणे, तिला स्वतंत्र विचार करण्याची संधी न देणे, तसेच तिच्यावर अनेक सामाजिक बंधने लादणे ही त्या काळातील सामान्य गोष्ट होती.

ताराबाई शिंदे यांच्यावर महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या समाजसुधारणेच्या विचारांचा प्रभाव होता. ते स्त्रीशिक्षण, जातिव्यवस्था विरोध आणि सामाजिक समतेसाठी कार्य करत होते. या विचारसरणीमुळे ताराबाईंना समाजातील अन्यायकारक प्रथा स्पष्टपणे दिसू लागल्या आणि त्यांनी त्या विरोधात लेखन करण्याचे धाडस केले.

'स्त्रीपुरुष तुलना' ग्रंथाची पार्श्वभूमी

'स्त्रीपुरुष तुलना' हा ग्रंथ १८८२ साली लिहिला गेला. त्या काळात एका विधवा स्त्रीवर समाजाने केलेल्या कठोर टीकेमुळे ताराबाई अत्यंत व्यथित झाल्या. त्या घटनेत स्त्रीवर सर्व दोष टाकण्यात आला, परंतु पुरुषाच्या चुकीकडे समाजाने दुर्लक्ष केले. ही दुहेरी नैतिकता पाहून ताराबाईंनी समाजाला प्रश्न विचारण्यासाठी हा ग्रंथ लिहिला.

या पुस्तकात त्यांनी स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक स्थान, नैतिकतेचे नियम, अधिकार आणि जबाबदाऱ्या यांची तुलना केली आहे. त्यांनी समाजातील पुरुषप्रधान मानसिकतेवर अत्यंत तीक्ष्ण आणि तर्कशुद्ध टीका केली.

स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न

ताराबाई शिंदे यांनी आपल्या लेखनातून एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला – जर स्त्री आणि पुरुष दोघेही मानव आहेत, तर समाजात त्यांना समान स्थान का दिले जात नाही?

त्या म्हणतात की समाजातील अनेक नियम स्त्रियांसाठी कठोर असतात, तर पुरुषांसाठी सैल असतात. पुरुष चूक केली तर समाज त्याला सहज



माफ करतो, पण स्त्रीने चूक केली तर तिच्यावर कठोर शिक्षा होते. ही परिस्थिती अन्यायकारक आहे.

त्यांनी स्त्रीला दोष देण्याच्या समाजाच्या वृत्तीवर कठोर शब्दांत टीका केली. स्त्रीवर सर्व नैतिकतेची जबाबदारी टाकणे आणि पुरुषांना स्वातंत्र्य देणे हा समाजाचा मोठा विरोधाभास आहे, असे त्यांनी स्पष्टपणे मांडले.

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई मो. 95520 98477

स्त्रीशिक्षणाचे महत्त्व

ताराबाई शिंदे यांना स्त्रीशिक्षणाचे महत्त्व पूर्णपणे पटले होते. त्यांच्या मते स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवले गेले, म्हणूनच त्या अनेक बाबतीत मागे राहिल्या. जर स्त्रियांना योग्य शिक्षण आणि संधी मिळाली, तर त्या समाजाच्या प्रगतीत मोठा वाटा उचलू शकतात.

स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब आणि समाज प्रगत होतो. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण देणे ही समाजाची जबाबदारी आहे, असे ताराबाईंचे मत होते.

समाजातील प्रथा आणि परंपरांवर टीका

'स्त्रीपुरुष तुलना' या ग्रंथात ताराबाईंनी अनेक सामाजिक प्रथा आणि परंपरांवर टीका केली आहे. त्यांनी सांगितले की अनेक परंपरा या स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत.

बालविवाह, विधवांवर लादलेली बंधने, स्त्रियांच्या शिक्षणावर बंदी आणि त्यांना घराच्या मर्यादेत ठेवणे या सर्व गोष्टींमुळे स्त्रियांचे जीवन कठीण झाले होते. ताराबाईंनी या सर्व गोष्टींचा निषेध केला आणि स्त्रियांना स्वतंत्र विचार करण्याचा अधिकार असावा, असे स्पष्टपणे सांगितले.

स्त्रीस्वाभिमान आणि स्वातंत्र्य

ताराबाई शिंदे यांच्या लेखनातून स्त्रीस्वाभिमानाची भावना स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी स्त्रीला कमी लेखण्याच्या मानसिकतेचा विरोध केला. स्त्री ही समाजाचा अविभाज्य भाग आहे आणि तिच्या कर्तृत्वाला योग्य मान्यता मिळाली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

स्त्रीला केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी व्यक्ती म्हणून न पाहता, तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता देणे आवश्यक आहे. तिच्या विचारांना, भावनांना आणि क्षमतेला समाजात योग्य स्थान मिळाले पाहिजे.

ग्रंथाचे साहित्यिक आणि सामाजिक महत्त्व

'स्त्रीपुरुष तुलना' हा मराठी साहित्यातील पहिल्या स्त्रीवादी लेखनांपैकी एक मानला जातो. त्या काळात एका स्त्रीने इतक्या धाडसी पद्धतीने समाजावर टीका करणे ही मोठी गोष्ट होती.

या ग्रंथामुळे समाजातील अनेक लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले गेले. पुढील काळात स्त्रियांच्या शिक्षणासाठी आणि अधिकारांसाठी झालेल्या चळवळींना या विचारांनी प्रेरणा दिली.

आजच्या काळातील संदर्भ

आजच्या काळात स्त्रिया शिक्षण, विज्ञान, क्रीडा, राजकारण, कला आणि उद्योग या सर्व क्षेत्रांत यशस्वी होत आहेत. तरीही समाजात काही ठिकाणी अजूनही स्त्री-पुरुष असमानता दिसून येते.

म्हणूनच ताराबाई शिंदे यांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यांचे लेखन आपल्याला समाजातील अन्याय ओळखण्याची आणि त्याविरुद्ध आवाज उठवण्याची प्रेरणा देते.

निष्कर्ष

ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुष तुलना' या ग्रंथातून समाजातील दुहेरी नैतिकतेला आणि पुरुषप्रधान विचारसरणीला आव्हान दिले. त्यांच्या धाडसी आणि तर्कशुद्ध लेखनामुळे स्त्री-पुरुष समानतेचा विचार समाजात पोहोचला.

महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे स्त्रीस्वातंत्र्य, समानता आणि न्याय या मूल्यांचा आदर करणे होय. समाजात स्त्री आणि पुरुष यांना समान स्थान मिळाल्यासच खऱ्या अर्थाने प्रगती साध्य होऊ शकते.

या पुस्तकातून त्याकाळी स्वतःचे मत विचार असे ठामपणे मांडणाऱ्या ताराबाई शिंदे यांना महिला दिनानिमित्त मानाचा मुजरा..

आदरणीय महात्मा फुले यांनी ताराबाई शिंदे यांचे या निबंधाबद्दल विशेष कौतुक केले आहे. ही बाब उल्लेखनीय आहे.

या पुस्तकातून विचार करण्यास चालना मिळते. चाकोरीबाहेर पाहण्याचा विशाल दृष्टिकोन मिळतो.

सर्वांनी वाचावे असे झणझणीत सणसणीत वैचारिक पुस्तकं.

पुस्तकाचे नाव.
महाराष्ट्राचे शिल्पकार... ताराबाई शिंदे
लेखकाचे नाव. इंद्रजीत भालेराव
पृष्ठसंख्या. ६४ किंमत. २५
प्रकाशन : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

****

सज्जनांचे मौन : एक दाहक वास्तव

ज्योतिर्मय साहित्य

परवा टीव्हीवर महाभारतातला द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग पाहत होतो. हा प्रसंग अनेक वेळा पाहिलेला असला तरी प्रत्येक वेळी तो मनाला नव्याने अस्वस्थ करून जातो. खरे तर हा प्रसंग इतका हृदयविदीर्ण करणारा आहे की तो पाहवत नाही. भर दरबारात उभ्या असलेल्या द्रौपदीचा आक्रोश, तिने लज्जा रक्षणासाठी केलेली धडपड, तिचाआकांत, तिच्या डोळ्यांत दाटलेले अश्रू आणि तिची असहाय्यता पहावत नाही.

पण त्या प्रसंगात सर्वांत जास्त अस्वस्थ करणारी गोष्ट कोणती आहे हे माहिती आहे का? तर ती आहे सभेत बसलेली महान पराक्रमी अशी धुरंधर मंडळी. पितामह भीष्म, आचार्य द्रोण, कृपाचार्य, विदुर यांसारखे धर्मनिष्ठ आणि विद्वान मानले जाणारे लोक त्या दरबारात उपस्थित असतात. पण त्या वेळी ही सगळी मंडळी आपल्या तोंडात जणू मिठाची गुळणी धरून असतात. अन्याय डोळ्यांसमोर घडत असताना ते हातावर हात धरून शांत बसलेले दिसतात. त्यांची हतबलता पहावत नाही.

त्याशिवाय ज्यांनी अशा प्रसंगी उसळून उभे राहावे असे द्रौपदीचे पराक्रमी म्हणून ओळखले जाणारे पाच पतीदेखील त्या वेळी असहाय्य होऊन बसलेले असतात. त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या पत्नीचा अपमान होत असताना ते हात चोळत बसण्यापलीकडे काही करू शकत नाहीत. ज्यावेळी आपल्या पत्नीच्या पदराला कोणी हात घालते आहे अशा वेळी राजशिष्टाचार, द्युताचे नियम इत्यादी सगळ्या गोष्टी बाजूला सारून भीम, अर्जुन यांच्यासारखी धुरंदर मंडळी उभी राहिली असती तर पुढील महाभारत कदाचित घडले नसते. शेवटी द्रौपदीचा कृष्ण सखा मदतीला धावतो.

हे सगळे पाहून अस्वस्थ व्हायला होते. ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने गीता फक्त अर्जुनाला सांगितली नाही. अर्जुन हा निमित्त आहे परंतु गीतेचा उपदेश हा सर्वांसाठी आहे. त्याचप्रमाणे मला असे वाटते की हा द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग केवळ द्रौपदी पुरता मर्यादित राहत नाही द्रौपदी ही प्रातिनिधिक आहे. ती केवळ ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तिरेखा म्हणून सोडून देता येणार नाही. ती जगातील सगळ्या स्त्रियांची प्रतिनिधी आहे. दुर्योधनादि कौरव सोडले तर दरबारात बसलेली सगळी मंडळी म्हणजे सज्जन मंडळी आहेत असे म्हणूया. हे तथाकथित सज्जन देखील सार्वकालिक सज्जनांचे प्रतिनिधी आहेत असे मला वाटते आणि अशा सज्जनांचे मौन किंवा त्यांची निष्क्रियता समाजासाठी किती घातक आहे याचे हे इतिहासाने दिलेले तेव्हापासूनचे उदाहरण आहे.



विश्वास देशपांडे
चाळीसगाव

द्रौपदी वस्त्रहरणाचा महाभारतातील हा प्रसंग केवळ एका स्त्रीच्या अपमानाची कथा नाही, तो समाजातील सज्जनांच्या निष्क्रियतेचा आरसा आहे. अन्याय करणारा दुर्जन नक्कीच दोषी असतो; पण त्याच्याइतकाच दोष त्या सज्जनांचाही असतो, जे आपल्या डोळ्यासमोरअन्याय घडत असताना शांत बसलेले दिसतात. अशावेळी त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा, त्यांच्या पराक्रमाचा काय उपयोग ! त्यांचे शिक्षण व्यर्थच म्हणायचे !

आता आपल्या लज्जा रक्षणासाठी कोणी येणार नाही हे जेव्हा द्रौपदीला लक्षात आले, तेव्हा तिने अनन्य स्वराने श्रीकृष्णाचा धावा केला. त्याला आर्त हाक मारली. द्रौपदीचा हा सखा त्या हाकेला प्रतिसाद देत धावून आला आणि त्याने तिची लाज वाचवली. तिच्या साडीचे अंतहीन वस्त्र झाले. तिचे वस्त्र ओढणारे हात थकून जमिनीवर पडले आणि भर दरबारात तिचे जे वस्त्रहरण होणार होते ते टळले.

त्या प्रसंगी संकटाच्या क्षणी श्रीकृष्ण धावून आले. आजही ते तसेच येतील का ? त्यांची वाट पाहायची का ? आजच्या काळात तसे होणे शक्य आहे का ?

आजच्या या काळात कोणा अबलेच्या आर्त हाका ऐकून श्रीकृष्ण धावून येतील आणि तिची दुष्टांच्या तावडीतून सुटका करतील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे.

आजची परिस्थिती वेगळी आहे. आज प्रत्येक सज्जन माणसालाच स्वतःमध्ये कृष्ण जागवावा लागेल. आपण भगवद्गीता वाचतो. अनेकदा तिचे पारायणही करतो. तिच्या श्लोकांचा आदर करतो. पण गीतेचा संदेश केवळ वाचण्यासाठी नाही; तो आचरणात आणण्यासाठी आहे. अन्यायासमोर उभे ठाकणे, दुर्बलांच्या पाठीशी उभे राहणे आणि अधर्माला विरोध करणे हाच गीतेचा खरा अर्थ आहे. आपल्या कर्तव्यापासून च्युत झालेल्या अर्जुनाला कर्मप्रवृत्त करणे हाच गीतेचा उद्देश होता आपल्याला देखील गीता कर्म प्रवण करते.

समाजात अनेक ठिकाणी स्त्रियांवर वेळोवेळी अन्याय होतो. कधी घराच्या चार भिंतीत, कधी भर रस्त्यावर, तर कधी तिच्या कार्यक्षेत्रात. अशा वेळी अनेकदा सभोवताली उभे असलेले (सज्जन) लोक गप्प राहणे पसंत करतात. सत्तेची भीती, पैशाचा मोह किंवा स्वतःच्या सुरक्षिततेची चिंता या कारणांमुळे सज्जन लोक मौन बाळगतात.

पण इतिहास सांगतो की समाजाचे सर्वांत मोठे नुकसान दुर्जनांच्या शक्तीने होत नाही; ते सज्जनांच्या मौनामुळे होते. लोकशाहीत जेव्हा निवडणुका होतात, तेव्हाही बऱ्याचदा सज्जनशक्ती मौन राहते त्यामुळेच नको असलेल्या व्यक्ती सत्तेवर येण्याचा धोका असतो.

८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा होतो आहे. त्या दिवशी आपण स्त्रीशक्तीचा गौरव करतो, तिच्या कर्तृत्वाचा सन्मान करतो. तिचे अभिनंदन करून मोकळे होतो. परंतु तिचा खरा सन्मान केवळ अभिनंदनाच्या संदेशांत नाही. तो त्या वेळी सिद्ध होतो, जेव्हा अन्यायाच्या प्रसंगी समाजातील सज्जन लोक धैर्याने उभे राहतात. असे जेव्हा होईल तेव्हाच स्त्रीला आपण सुरक्षित असल्याचा विश्वास निर्माण होऊ शकेल. एक व्यक्ती म्हणून तिला तिचे अधिकार देणे ही त्या पुढची पायरी आहे.

वर उल्लेख केलेला महाभारतातील प्रसंग आपल्याला सांगतो की सज्जनांचे मौन हेही अनेकदा अधर्माला बळ देणारे असते. आजच्या काळात श्रीकृष्ण प्रत्यक्ष येणार नाहीत. कारण त्यांनी गीतेच्या माध्यमातून विवेकाची ज्योत आपल्या हातात दिली आहे.

आता सज्जनशक्ती हीच कृष्णशक्ती व्हावी ही काळाची गरज आहे. कदाचित स्त्रीसन्मानाचा खरा उत्सव तेव्हाच साजरा होईल, जेव्हा समाजातील सज्जनांचे मौन तुटेल.

घराला घरपण देणारी....''महिला''

ज्योतिर्मय साहित्य

महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी जो लढा दिला त्याच्या स्मरणार्थ ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. तर संपूर्ण अमेरिका, आणि युरोप सहित जवळपास जगभरातल्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत मतदानाचा हक्क नाकारला होता.त्याविरोधात महिलांनी लढा उभारला होता, त्याच वेळी जर्मनीतल्या कम्युनिस्ट कार्यकर्ती क्लारा झेटकिन प्रभावित झाली. असा एखादा दिवस असावा, ज्या दिवशी जगभरातल्या महिला आपल्या मागण्यासाठी लढ्याचा निर्धार व्यक्त करू शकतील.अशी कल्पना मांडली.१९१० मध्ये कोपनहेगनला झालेल्या परिषदेत ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून ठराव पास झाला.

पण भारतात मुंबई येथे ८मार्च १९४३ रोजी पहिला महिला दिन साजरा झाला.

दरवर्षी येणाऱ्या सणा प्रमाणे जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहानं साजरा केला जात असतो. वर्षभरात ज्या महिलांनी, शिक्षण, कला, क्रिडा, साहित्य, राजकीय क्षेत्रात विशेष कार्य केल असतं, तसेच काही महिलांनी एखादे विशेष प्रावीण्य दाखविले असते, अशा महिलांचा सत्कार, केला जातो.सन्मान केला जातो. अनेक संस्था, कार्यालयात, महिला दिन साजरा केला जातो.अशा रितीने महिलांचा सन्मान करणे उचितच आहे.तो करायलाच हवा. महिला दिन का साजरा केला जातो ?ह्याची सुरूवात कधी झाली ? ह्या बाबतीत मात्र बहुसंख्य महिला अनभिज्ञ आहेत. आठ मार्च महिला दिन आहे, तो साजरा करणे फक्त एवढेच केले जाते.

महिला दिन असा निरनिराळ्या ठिकाणी साजरा होत असतानाच मनात अनेक प्रश्न उपस्थित होतात.ते अगदी सहज आहे.

अनेक महिलांनी निरनिराळ्या क्षेत्रात जसे शिक्षण, साहित्य, कला, राजकीय, सामाजिक, क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सत्तेची पद भुषविली आहेत. त्यांना संधी दिली तर त्या काय करु शकतात हे दाखवून दिले आहे.आपले वेगळेपण सिध्द केले आहे.

स्व.ईंदिरा गांधी, स्व.सुषमा स्वराज, श्रीमती प्रतिभाताई पाटील, सुमित्राताई महाजन, द्रौपदी मुर्म, आदी महिलांनी आपले वेगळेपण सिध्द केल आहे. उच्च पदावर त्या पोहचल्यात.

तर मेधा पाटकर, यांनी समाजिक कार्यात स्वःतला झोकून दिले आहे. किरण बेदींची प्रशासकीय कारकीर्द पोलिस प्रशासनात, तिहार जेलमध्ये केलेल्या बदलाने उल्लेखनीय ठरली होती. मीरा बोरवणकर, सुधा मूर्ती आहेत.

आजही राजकीय क्षेत्र बघितले तर,डॉ निलम गोरे,खा.सुप्रिया सुळे, आ.पंकजा मुंढे, खा.प्रणिती शिंदे, आ.भावना गवळी, खा.रक्षा खडसे, आ.श्रध्दा महाले, खा.डॉ. मेधा कुळकर्णी या महिलांनी राजकीय क्षेत्रात आपलं स्थान निर्माण केलय. अनेक लेखिका आहेत, शिक्षण क्षेत्रातील महिला आहेत, कला. क्षेत्र, त्यांनी वेगळं स्थान निर्माण केलयं. आजही अनेक महिला प्रशासकीय सेवेत उच्च पदावर कार्य करीत आहेत. मुख्य सचिव, आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, तहसीलदार, गट विकास अधिकारी, नगर पालिका मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, बँक अधिकारी अनेक क्षेत्र आहेत. कुठलं क्षेत्र बाकी नाही.आय. टी. क्षेत्रात तर खूप मुली दाखल होत आहे.

जुना इतिहास बघितला तर जिजाबाई, राणी लक्ष्मीबाई, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले,अशी अनेक उदाहरणे देता येतील. महिलांनी एक वेगळा क्रांतीकारी ईतिहास घडवलाय. आनंदीबाई, सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाचा, स्त्रीमुक्तिचा पाया रचला.पुण्यात महिलांसाठी पहिली शाळा काढली. एकूण अठरा शाळा काढल्यात.

पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले, पहिली महिला आयपीएस महाराष्ट्र मीरा बोरवणकर, पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, पहिली महिला मंत्री शालिनीताई पाटील, पहिली महिला न्यायाधीश उच्च न्यायालय सुजाता मनोहर, त्यानंतर मृदुला भाटकर, पहिली महिला महापौर निर्मिती सावंत प्रभावळकर, पहिली महिला राज्यपाल विजयालक्ष्मी पंडित, पहिली महिला एव्हरेस्ट सर करणारी कृष्णा पाटील, पहिली महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ल, पहिली महिला साहित्य संमेलन अध्यक्ष कुसुमावती देशपांडे, नंतर दुर्गा भागवत, अरुणा ढेरे, राष्ट्रपतीपदी प्रतिभाताई पाटील. अशी प्रतिभावान महिलांची उदाहरणे आहेत.

''आई सारखे दैवत साऱ्या जगा मध्ये नाही''

किंवा

''जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगासी उध्दारी'' असे आपण नेहमीच म्हणतो.पण–

आता दुसऱ्या बाजूचा विचार बघीतला तर सध्या

त्या जगाचा उध्दार करणाऱ्या, दैवत असणाऱ्या, ज्या स्त्री शक्तिची नवरात्रात पूजा केली जाते.

त्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे. तीनशे पासष्ट दिवसांत एक दिवस महिला दिवस साजरा करुन त्यांचा मानसन्मान केला जातो.बाकीच्या तीनशे चौसष्ट दिवसांचे काय? हा महत्वाचा प्रश्न आहे. स्त्रिया किती सुरक्षित आहेत. रोजच वर्तमानपत्र उघडतो तर त्यात महिलांचे शोषण,विनयभंग, बलात्कार, खून अश्या बातम्या असतातच. अगदी पाच–सात वर्षाचे मुलींन पासून तर साठ–पासष्ट वर्षांचे महिलांचा त्यात समावेश असतो.ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट

आहे.दोन दिवसापूर्वी नाशिक जिल्ह्यात इव्हेंट मॅनेजमेंटचे नावाखाली दोन लाख रुपयांना महिलेची विक्री केल्याची घटना वाचायला मिळाली.

समाजात, शाळेत, नोकरीच्या ठिकाणी, नातेवाईकात, प्रवासात, एकटी स्त्री किती सुरक्षित आहे? मागील काळात

अनेक ठिकाणी घडलेल्या बलात्काराच्या पाशवी घटनात एका स्त्री वर दहा पुरुष बलात्कार करतात. अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार अशा अनेक ठीकाणी दररोज घडणाऱ्या स्त्रीअत्याचाराच्या घटना हे काय दर्शवितात? अनेक कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग सारख्या घटना घडतात त्यांच शोषण होत, त्या घटना दाबून टाकल्या जातात.

अनेक वेळा बायकांसारख्या बांगड्या भरल्या का? शब्दप्रयोग करून हिणवले जाते. हा सुध्दा स्त्रियांचा अपमानच आहे. बांगड्या भरा.. बांगड्या भरा. असा शब्द प्रयोगा मागे स्त्रियांना कमी लेखण्याचा उद्देश आहे.

एका दूरचित्रवाणी वरील चर्चेत एका माजी मंत्र्यांनी शब्दप्रयोग केला होता, त्यावेळी स्व. विद्या बाळ यांनी त्यांना खूपच कडक शब्दात फटकारले होते. पण असा सडेतोडपणा सगळ्याच महिलांजवळ नसतो, ज्याची आज गरज आहे.अजून एका माजी मंत्र्यांनी भरसभेत ''आपल्या तहसीलदार मँडम ''हिरोईन'' आहेत, असा सभेत उल्लेख केला, राजकीय क्षेत्रात तर महिला विषयी अर्वाच्य बोलणे वाढत आहे.स्त्रीचा अपमान तर होतोच पण शाब्दिक शोषणाचा प्रकार असे त्याला म्हणता येईल. त्यांनी ज्या भावनेने तो शब्दप्रयोग केला जातो तो तो चुकीचा असतो..

स्त्रियांना अनेक भुमिकेतून जावे लागते. माता.. भगिनी.. पत्नी.. मुलगी. त्या त्या वेळची जीवनातील भुमिका खऱ्या असतात.त्यात निष्ठा असते. तीच तर बांगड्या घालत असते.. माता–भगिनी–पत्नी. तिची असे शब्दप्रयोगानी हेटाळणी करु नका.खऱ्या अर्थाने ती हिराँईन असते.

राजकीय क्षेत्रात ज्या महिला आहेत त्याच्यावरही खालच्या पातळीवर टिका

होते. सोशल मिडियावर कोणी काय लिहावे यावर काही बंधनच नाही.

राज्यात महिला आयोग आहे. त्यांनी अशा घटनांची नोंद घेउन संबधितांवर कारवाई करणे अपेक्षित असते. पण त्यांच्यावरच घाणेरड्या शब्दात लिहिले जाते. त्या काही करु शकत नाही. तर ईतरांची काय कथा.

बलात्कार, स्त्रीअत्याचाराचे घटनामध्ये कारवाईस विलंब होतो. काही वर्षे निघून जातात.त्या घटनेच गांभीर्य रहात नाही. हे आपण बघतोय. आंध्रप्रदेश सरकारने कँबिनेट मध्ये ''दिशा''कायदा मंजुरी दिली,सात दिवसांत तपास, चौदा दिवसांत न्यायालयीन कामकाज, आणि एकवीसाचे आत आरोपीस मृत्यूदंड. असा कायदा लागू होण्याची खूप चर्चा झाली.

महाराष्ट्रात आता स्त्रियांच्या संरक्षणासाठी ''शक्ती'' विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर होऊन त्यावर राज्यपालांची सही झाली. व ते पुढे राष्ट्रपतींच्या सहीसाठी वरती पाठवले गेले. ते दुरुस्तीसाठी परत आले. कायदा पास होईल पण असलेल्या कायद्याची अंमलबजावणी होणे हे महत्त्वाचे आहे. असंख्य कायदे अस्तित्वात आहेत, परंतु त्याची काय परिस्थिती आहे हे आपण बघतोच.

कामाच्या ठिकाणी वावरताना महिलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळणं हा त्यांचा हक्क आहे. हाच हक्क जपण्यासाठी महिला आयोगाचे अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी पॉश ऑडिटचे निर्देश दिले आहेत. महिनाभरात राज्यातील सर्व सरकारी आणि खाजगी कार्यालयांचे परीक्षण पोस्ट ऑडिट होणार असून त्रुटी आढळल्यास कडक पावले उचलली जातील, असं सांगण्यात आलं आहे. महिला दिन जवळ आल्यानंतर अशा अनेक प्रकारच्या गोष्टी जाहीर होतात परंतु त्यातील किती पूर्ण जातात हा ही एक व चिंतन आणि विचार करण्यासाठी गोष्ट आहे.

दुसरा मोठा प्रश्न आहे स्त्रियांचे बाबतीत तो दुय्यम स्थानाचा.आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा करुन घेतला जाणारा वापर. तसेच जाहिरात क्षेत्रात स्त्री देहाचा केला जाणारा वापर.

आता तो कसा केला जातो हे काय सांगायला हवे.?

आपला उत्पादनाचा खप वाढवण्यासाठी, दूरचित्रवाणीवरील मालिकांमध्ये, जाहिरातीमध्ये, अंडरवियर, बनियान, अत्तर स्प्रे, कुठल्याही चित्रपट, नाटकांचे जाहिरातीसाठी स्त्री देहाचा नको तितका वापर, स्त्री देहाच्या नको त्या भागाच प्रदर्शन केलं जात. अर्थातच यात स्त्रियांचा दोषही आहेच.नाही म्हणून चालणार नाही. त्या स्वतःच अधःपतन करुन घेत आहेत. चित्रपटात स्नानाचे आणि बेडसीन दिले जातात.. अतिशय भडक आणि सेक्सी दृश्य असतात.. अशे दृश्य व जाहिराती त्यांनी करायला नकोत. त्यात अमुलाग्र बदल आवश्यक आहे. स्त्री संघटनांनी,आयोगाने ह्याचेवर गंभीरपणे विचार करावा.

राजकीय क्षेत्रात, जसे विधान सभा, विधान परिषदेत स्त्रियांना नगण्य स्थान आहे.त्यातही मंत्रिपदासाठी वर्णी लागली तरी, कँबिनेट दर्जा फारच कमी महिलांना मिळतो.अशी परिस्थिती आहे.जिल्हा आणि तालुका पातळीवर ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हापरिषद, ह्या ठिकाणी स्त्री राखीव जागा असतात. त्यात काय परिस्थिती आहे हे आपण सगळेच जाणतो. सत्ताकेंन्द्र घरातच रहावे म्हणून तिकिटांचे वाटपासाठी व्यवस्था असते. त्यातील बहुतांश महिलांना ना समाजकार्याची आवड असते ना राजकारणाची.केवळ सत्ते साठी महिलांचा वापर करुन घेतला जातो काही महिलांना प्रासंगिक चार शब्द बोलता येत नाही.आपले हक्क जबाबदाऱ्या कर्तव्ये काय माहित नसते. काही महिलांना तर सही सुध्दा करता येत नाही. त्यांचे पतीच कामकाज बघतात ही परिस्थिती नाकारता येणार नाही.

खरंच ज्या महिलांना समाजकार्य, राजकारणाची आवड असते त्यांना मात्र संधी मिळत नाही, महिला सक्षम पणे उभ्या रहात नाही त्याच्यात निर्णयक्षमता येत नाही तो पर्यंत स्त्रीमुक्त आहे हे खऱ्या अर्थाने म्हणता येणार नाही.

आता तर खूप ठिकाणी महिला नगरसेविका, नगराध्यक्ष, महापौर पदावर निवडून आलेल्या आहेत. खूप मोठी संधी चालून आली आहे.

आंतरराष्ट्रीय दिनाची थीम पहिल्यांदा १९९६ मध्ये सादर करण्यात आली. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक थीम निश्चित केली जाते. यंदाची थीम ही गिव टु गेन अशी आहे. याचा अर्थ असा की जेव्हा तुम्ही एखाद्याला काही देता तेव्हा तुम्हालाही त्याचा फायदा होतो. या थीमचा उद्देश लोकांना उदार हस्ते दान करण्यास प्रोत्साहित करणे आणि लिंग समानतेला प्रोत्साहन देणे आहे.

महिलांच्या हक्कांबद्दल आणि प्रतिष्ठेबद्दल जागरूकता पसरवणे, शिक्षण, नोकऱ्या आणि नेतृत्वात लिंग समानतेला प्रोत्साहन देणे,

घरगुती हिंसाचार, छळ, असमान वेतन आणि भेदभाव यासारख्या समस्यांवर प्रकाश टाकणे

महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि विकासाला पाठिंबा देण्यासाठी सरकार, संस्था आणि कुटुंबांना प्रोत्साहित करणे.

स्त्री विषयक अनेक कायदे आहेत, महिलांना मिळणाऱ्या सवलतीआहेत,त्यांचीअधिकाधिक माहिती महिला पर्यंत पोहोचाव्यात, शक्ती कायदा लागू होऊन, अंमलबजावणी व्हावी,आणि महत्वाचे, मुळातच स्त्रियांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन बदलावा. महिलांनीही आपल्या देहाचं जाहिरातीसाठी होणार प्रदर्शन थांबवावं. ज्या महिलांमध्ये काही कतृत्व आहे त्यांना संधी प्राप्त करुन द्यावी. तरच महिला दिवस साजरा करण्याचे सार्थक होईल. आजचा दिवस जितका महिलांसाठी खास,महत्त्वाचा आहे, तितकाच तो सगळ्यांसाठीही महत्त्वाचा आहे. कारण असे आहे, स्त्री एक मार्गदर्शक आहे. समर्थक आहे. प्रेरणादायी व्यक्ती आहे. प्रेरणेचे स्त्रोत आहे. ती आपल्या आयुष्यात कधी आई म्हणून, कधी बहीण म्हणून, कधी मैत्रीण म्हणून, तर कधी जीवनसाथी म्हणून असते. तिच्या प्रत्येक भूमिकेचा आपण आदरच करायला हवा. आपल्या आयुष्यात असणाऱ्या प्रत्येक स्त्रीचे आभार मानले पाहिजेत, कारण तिच्या विना जीवन अपूर्ण आहे. ती आधी कुटुंब सांभाळत होती आता नोकरी करून कुटुंब सांभाळते.. पुरुष मात्र नोकरीच करत आलाय..कुटुंबासाठी अर्थार्जन करणे, कुटुंब सांभाळायला त्याला तेव्हाही स्त्रीच हवी होती आणि आजही स्त्रीच हवी आहे.. तो अवलंबून आहे त्या स्त्रीवर.. जागतिक महिला दिना निमित्ताने सर्व मातांना, भगिनींना, पत्नीला, मैत्रिणींना आणि आपल्या आयुष्यातील प्रत्येक स्त्रीला या विशेष दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

स्त्री ची विविध रूपे

ज्योतिर्मय साहित्य

जागतिक महिला दिन दरवर्षी जगात ८ मार्च रोजी साजरा केल्या जातो.

या दिवशी विविध क्षेत्रात विविध पदावर, कला, साहित्य,सामाजिक कार्य, वैद्यकीय सेवा आदी कार्यात निस्वार्थ भावनेने मोलाची कामगिरी करणाऱ्या महिलांना विविध ठिकाणी सन्मानित केल्या जाते.

हे सर्व छान आहे, यातून इतर महिलांना प्रेरणा आणि ऊर्जा मिळते. मात्र दरवर्षी महिला दिन साजरा होतो,तो फक्त त्या दिवसापुरता विचार सोडला तर महिलांचा कायम सर्वत्र आदर केल्या

जातो का? हा प्रश्न जर कुणी विचारला तर उत्तर मी काय देऊ? नाहीच असे येईल ना?कारण आजही समाजात महिला बद्दलची परिस्थिती संपूर्ण बदललेली नाहीये,लोकांची मानसिकता बदललेली नाहीये.

खरं तर आज कोणत्याच क्षेत्रात स्त्री मागे नाही. ती कायम प्रगतीच्या पायऱ्या चढते आहे. गृहिणी तर घरसंसार सांभाळत संस्काराची बीजे पुढच्या पिढीत रुजविण्याचा प्रयत्न करत असतात आणि अनेक महिला आपली नौकरी किंवा व्यवसाय सांभाळून घरसंसार सांभाळण्याचे कार्य करण्यात कुशल आहेत. खरंच सर्व महिलांचे विशेष कौतुक आहे.

कल्पना करा, एखादया घरात एकही महिला नसेल तर ते घर प्रसन्न वाटेल का?

त्या घरात गेल्यावर भकास वाटते, असे माझे तरी मत आहे घरातील महिला ही घरातील तेजोमय वाती सारखी असते, ती नंदादीपा सारखी घराला अखंड प्रकाशित ठेवण्याचे कार्य करते, आणि ते ही अगदी स्वतः चे अस्तित्व विसरून.

घरातील आई असेल, पत्नी असेल, आधी त्या घरातील पुरुषाला गरम गरम जेऊ घातल्याशिवाय तिला प्रसन्न वाटत नाही.

तिच्या प्रेमळ हाताची चव काही औरच असते आणि ते अन्न पवित्र असतं. हे सर्व स्त्री च करते.

लोकप्रिय अभिनेता, लेखक,

कवी संकर्षण कऱ्हाडेची आई वरील एक फार सुंदर कविता ऐकण्यात आली होती. त्यात संकर्षण म्हणतो, तुम्ही कुणी कधी आईला आपल्या आधी जेवताना पाहिले आहे काय?

खरंच फार मोठं गमक या प्रश्नात आहे, खूप काही सांगणारं. स्त्री ही अन्नपूर्णा आहे स्त्री ही असामान्य शक्ती आहे,घरातील ऊर्जा आहे, घरची प्रेरणा, घराचा आरसा आहे .

साऱ्या विश्वात आता महिला विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवित आहेत.हे सारं असताना प्रश्न आहे आज तरी महिला सुरक्षित आहेत का? तर नाहीच असेच म्हणावे लागेल.

खरं तर ज्या घरात जिजाऊ माता असते त्या घरात शिवबा सारखा सर्वश्रेष्ठ राजा घडतो,

ज्या घरात मुक्ताबाई सारखी बहीण असते त्या घरात संत ज्ञानेश्वर सारखा मोठा भाऊ संपूर्ण विश्वाला ज्ञान वाटतो, ज्या घरात सिते सारखी पत्नी असते, तेथे श्री रामा सारखा पती असतो.

अश्या प्रकारे या विश्वात स्त्री चे अनेक रूपे आहेत त्यावर माझी एक स्वलिखित कविता खाली दिली आहे

''स्त्री'' ची रूपे
कामात राहती व्यस्त सदा
बनुनी तू ग अष्टभुजा
शिकवण देशी स्व संतती

गिरीश वसेकर (देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००

बनुनी तूच ग सरस्वती
पैश्याची वाटता कधी कमी
अवचित बनशी तू महालक्ष्मी
प्रेमाने उदर भरणा करण्या
बनशी नित्य तू अन्नपुर्णा
घर पडता कधी संकटी
तूच बनते तेंव्हा पार्वती
गरजेला रूद्र अवतार घेता
बनशी तूच ग कालीमाता
राक्षसीवृती दिसता कुठे जनी
बनुनी येई तू महिषासुरमर्दिनी
भेटता कुणी अवचित पाखंडी
बनशी तूच ग रणचंडी
तूच जननी तूच भगिनी
तूच तनया तूच अर्धांगिनी
तुझ्या विना पुरुष अपूर्ण
तुझ्या विना अपूर्ण अवनी.

एकदम नाही असे नाही पण आज बऱ्याच ठिकाणी महिलांच्या बाबतीत थोडा फार चांगला फरक पडला आहे, स्त्री चा सन्मान होतो आहे पण

तरीही या विश्वात अजून तोच प्रश्न अनुत्तरित आहे,

स्त्री ला दुय्यम स्थान की पुरुषा एवढे समान स्थान?

विश्वातील सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देतो,आणि येथे थांबतो.

तू चाल पुढं...

ज्योतिर्मय साहित्य

''चाल तू एक एक पाऊल
काळोखातुन सूर्याकडे,
वेदना, अपमान, अश्रू,
सोड मागे, बघ पुढे,,,''

जगातील कष्टकरी, शेतकरी, मजूर, शिक्षित, अशिक्षित, विधवा, अपंग, निराधार, व्रद्ध आणि हो गर्भामध्ये रुजत असलेल्या समस्त स्त्री तत्वाला सविनय अभिवादन करून महिला दिनाच्या शुभेच्छा देते. सगळीकडे स्पर्धा, उपक्रम, सन्मान सोहळे, शासकीय सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, स्तरावर आयोजित करून आठ मार्च हा जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. महिला, मुली यात उस्फुर्तपणे सहभाग घेत आहेत हे बघून आनंदच होत आहे. यातील एक घटक मागे पडला तो म्हणजे कुटुंब ! कौटुंबिक स्तरावर हा इव्हेंट अजून पोहोचला नाही असं म्हणता येईल. वास्तविकपणे समाजशास्त्रामध्ये कुटुंब हाच एखाद्या सामाजिक परिवर्तनाचा मूळ पाया असतो हे वारंवार सिद्ध झाले आहे. भारताचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम एका कार्यक्रमांमध्ये मुलींच्या प्रश्नांना उत्तर देताना म्हणाले होते,

धार्मिकता हृदयात असेल तर,
चारित्र्यात सौंदर्य येते. चारित्र्यात सौंदर्य आले की, कुटुंबा सुसंवाद येतो, कुटुंबात सुसंवाद आला की, देशात स्थिरता येते,

आणि देशात स्थिरता आली की जगामध्ये शांतता प्रस्थापित होते !

या विधानाचा जर सुसंगतपणे विचार केला तर आज जग विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे, हे नव्याने सांगायला नको. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेने महिलांची जागतिक लोकसंख्या ४१३ कोटी आहे. म्हणजे ही लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या अर्धी आहे. परंतु आजही प्रगत – अप्रगत देशाच्या राजकीय वर्तुळात पुरुषांचा दबदबा गेल्या अनेक शतकांपासून आबाधित आहे. ज्या तुलनेत आत्तापर्यंत जागतिक स्तरावरील पुरुषांनी सत्ता शासन चालवले स्त्रियांचे प्रमाण या तुलनेने नगण्य आहे. मग आजच्या जागतिक अशांततेचे पातक हे जागतिक स्तरावर आपापल्या देशाचे प्रतिनिधित्व करणारे नेते घेतील का? हा खरा प्रश्न आहे .परत आपण राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या वाक्याकडे वळूया, की धार्मिकता हृदयात असेल तर,

मग आपण धार्मिक नाही का? इतर देश आपापला धर्म विसरलेत का? तर नाही !

या उलट गेल्या दशकांपासून जगातील सर्वच देश धार्मिकतेच्या बाबतीत आक्रमक झालेले दिसून येतात. मग धर्म जर शांती,

सहिष्णुता, बंधुभाव शिकवत असतो आणि त्याचं अनुकरणही होत असेल तर मग हा रक्तपात का ? याचे उत्तर दुसऱ्या आणि तिसऱ्या वाक्यात सापडतं ते असं की हृदयात धार्मिकता असेल तर चारित्र्यात सौंदर्य येते! इथेच काहीतरी गल्लत होते आहे. नुकत्याच जागतिक पत्रकारितेने दखल घेतलेल्या एपस्टीन फाईल्सच्या वेगवेगळ्या खुलासातून असे दिसून आले आहे की हे नेतृत्व करणारे लोक चारित्र्य शून्य, भोग विलासी, आणि पाशवी वृत्तीचे होते आणि आहेत ही. मग जर चारित्र्याचे सौंदर्य शोधण्यात

अपयश येत असेल आणि कुटुंबाच्या, देशाच्या, जगाच्या, शांततेला सुरुंग लावणाऱ्या महत्त्वाच्या घटकाचाच म्हणजेच निष्कलंक चारित्र्याचा जर आपण वध करत असू तर मग आज जे रक्तपाताचं अशांततेचे चित्र आपण बघत आहोत ते नाकारून कसे चालेल? ते आपल्याला स्वीकारायलाच हवं!

कुठेतरी जागतिक स्तरावर महिलांच्या रूपात असलेल्या लोकसंख्येला डावलून निर्णय घेणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेत हे अपयश आहे.

एकंदर महिला सशक्तिकरण, सुरक्षा, आरोग्य या गोष्टींसाठी काम करणाऱ्या यंत्रणांवरही प्रश्न उभे राहतात एनआरसीबी यांच्या एका रिपोर्टमध्ये असे जाहीर केले आहे की १३ लाखाहून अधिक महिला २०१९ – २० ला भारतातून बेपत्ता झाल्या आहेत. एकट्या महाराष्ट्र ही संख्या ५०,००० च्या जवळपास आहे यातील पंधरा हजाराच्या आसपास या अल्पवयीन मुली आहेत. मग आपल्याला या मुलींचं काय होत असावं? असा प्रश्न नक्कीच पडतो. त्याची उत्तरही आपण आपल्या परीने शोधतोच. पण समस्या इथे संपत नाहीत, एकट्या भारतात दरवर्षी एक कोटी पेक्षा जास्त अल्पवयीन मुलींचे विवाह व्यवस्थेच्या, यंत्रणेच्या डोळ्यात धुळ फेकून होत आहेत. यातूनच बालमाता मृत्यू, नवजात मृत्यू, कुपोषण या समस्या उद्भवत आहेतच. २००६ मध्ये आलेल्या या बालविवाह विरोधक कायद्यानंतर वीस वर्षे उलटूनही हे प्रमाण कोटीच्या घरात आहे ही बाब थक्क करणारी आहे. या सर्व परिस्थितीला सावरून पोट भरण्यासाठी मोलमजुरी करणाऱ्या महिला आणि मुली कमी नाहीत. पी एल एफ च्या अहवालानुसार २०२३ २४ या वर्षांमध्ये १६ करोड सहा लक्ष महिला या १५ ते ३० वयोगटातील आहेत ज्या अंग मेहनतीची कामे करतात भारतातील एकूण ५१% पेक्षा जास्त महिला मुली आजही अंधश्रद्धा, परंपरा, याच्या जोखंडात अडकलेल्या असून अनेक सुविधांचा अभाव, आरोग्य विषय समस्या यांचा सामना करीत आहेत. एरवी घरामध्ये, तुला काय कळतं?

बायकांना कुठे अक्कल असते? तू नको विचार करू, तुझे गुडघे दुखतील.!

असे महिलांच्या बुद्धीचे मापे घेणारी विधाने आपण ऐकत असतो मात्र असे निमुटपणे ऐकून घेणाऱ्या प्रत्येकीला माहिती असायला हवी की आनंदाची गोष्ट म्हणजे जागतिक बुद्धिमत्तेच्या स्तरावर भारतीय महिलांच्या बुद्धीचे तेज चमकत आहे. उच्च कोटीची बुद्धिमत्ता समस्या निराकरण, निर्णय क्षमता, अध्यायवत तंत्रज्ञान आत्मसात करणारी प्रतिभा ही जगातील महिलांच्या तुलनेत भारतीय महिलांमध्ये अधिक आहे.

हाय स्किल्स रेट रिपोर्ट
इंडियन वूमन --- १.९१
युनाइटेड स्टेट्स ---- १.७१
जर्मनी --- ०. ८४

वरील निरीक्षण आमच्या महिलांचा गर्व वाटावे असेच आहे. जगाचा इतिहास महिलांच्या शोषणाबरोबरच उत्कर्ष, उत्थान, सुधारणांच्या घटनांनी, क्रांतीने सामावलेला आहे. महाराष्ट्र मध्ये चक्रधर स्वामी, महात्मा बसवेश्वरांपासून महर्षी धोंडो केशव कर्वे महात्मा फुले यांनी स्त्री सन्मान सक्षमीकरण सुधारणा शिक्षण यासाठी प्रयत्न केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र हिंदू कोड बिल जे महिलांच्या अधिकार आणि हक्क हिरावून घेणारे होते त्याच्या विरोधात कायदेमंत्री पदाचा राजीनामा देऊन घटनात्मक अधिकार महिलांना प्रदान केले व गुलामीच्या जोखंडातून त्यांची मुक्ती केली आज भारतीय स्त्री मुक्त आहे. स्वातंत्र्याची फळे चाखत आहे. या स्वातंत्र्याचा फक्त स्वैराचार करू नये एवढीच अपेक्षा समाजाला आहे.

सुरज हुँ,
चमकते हुए मंजर की तरह हुँ ,
माथे पे जमाने के ,
मुकद्दर की तरह हुँ,,, !!

***

जागतिक महिला दिन

ज्योतिर्मय साहित्य

सध्या महिला दिनाचे औचित्य साधून समाजात वेगवेगळ्या स्तरावर कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस म्हणजे महिलांच्या संघर्षाचा, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि समान हक्क चळवळ याचा सन्मान करण्याचा दिवस! हे सगळे मिळवणे, आम्हीही माणूस आहोत, आमच्यावरही अन्याय होत आहे हे महिलांनाच सांगावे लागते. आवाज उठवावा लागतो. याची बरीच उदाहरणे पूर्वी पासून बघतो. कधी दुय्यम स्थान देऊन तर कधी मोठेपणा किंवा देवत्व बहाल करुन शर्करावगुंठीत अन्याय चालूच असतात. या विरुद्ध आवाज उठवण्याची सुरुवात प्रथम १९०८ मध्ये सुमारे १५००० महिलांनी कामाचे तास कमी करावेत, चांगले वेतन मिळावे आणि मतदानाचा अधिकार मिळावा या साठी मोर्चा काढला होता. तिथे आवाज उठवण्याची सुरुवात झाली. सन १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून घोषित केला.



हा दिवस साजरा करण्यामागे काही प्रमुख उद्देश आहेत. महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय यशाचा गौरव करणे. स्त्री–पुरुष समानतेसाठी जागरूकता निर्माण करणे. महिलांवरील भेदभाव आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठवणे.

महिला दिनाशी प्रामुख्याने तीन रंग जोडलेले आहेत:

जांभळा – न्याय आणि प्रतिष्ठेचे प्रतीक!

हिरवा – आशेचे प्रतीक.

पांढरा – शुद्धतेचे प्रतीक (आता कमी वापरला जातो).

आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात मग ते अंतराळ असो, राजकारण, क्रीडा किंवा उद्योग आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, प्रगती झाली असली तरी अजूनही अनेक ठिकाणी महिलांना समान संधी मिळणे बाकी आहे.

''स्त्री ही घराचा पाया आहे आणि समाजाचा कणा आहे. तिचा सन्मान करणे म्हणजे पर्यायाने संस्कृतीचा सन्मान करणे होय.''

सध्याच्या काळात महिला प्रगती करत असल्या तरी, त्यांना अनेक पातळ्यांवर अन्यायाचा आणि आव्हानांचा सामना करावा लागत आहे. महिलांवरील अन्यायाचे स्वरूप वेगवेगळ्या प्रकारे दिसते.

घरगुती हिंसाचार : हा महिलांवरील अन्यायाचा सर्वात जुना पण आजही गंभीर प्रकार आहे. महिलेला आपल्या जोडीदाराकडून शारीरिक किंवा लैंगिक हिंसेचा सामना करावा लागतो.

कामाच्या ठिकाणचा छळ आणि विषमता व लैंगिक छळ : महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळणे अजूनही कठीण आहे. विशाखा मार्गदर्शक तत्त्वे असूनही तक्रार करण्याचे प्रमाण कमी आहे.

वेतन तफावत : समान कामासाठी महिलांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाण्याचे प्रमाण आजही मोठ्या प्रमाणावर दिसून येते. आणि हे कोणत्याही स्तरावर (काही अपवाद वगळता) दिसून येते. कामाचे तास मात्र सारखेच असतात.

सायबर गुन्हे : तंत्रज्ञानाच्या काळात महिलांवरील अन्यायाचे नवीन स्वरूप समोर आले आहे. सोशल मीडियावर ऑनलाइन छळ, मॉर्फ केलेले फोटो वापरून ब्लॅकमेल करणे, सायबर स्टॉकिंग आणि गोपनीयतेचा भंग तंत्रज्ञानाचा गैरवापर करुन केला जातो.

सार्वजनिक ठिकाणी असुरक्षितता : रस्ते, रेल्वे स्थानके आणि बस स्टँड यांसारख्या ठिकाणी महिलांची सुरक्षितता हा मोठा प्रश्न आहे. पुणे आणि मुंबईसारख्या शहरांत दामिनी पथकांमुळे गुन्हेगारीत काहीशी घट झाली असली, तरी रात्रीच्या वेळी एकट्याने प्रवास करताना महिलांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे.

सामाजिक आणि कौटुंबिक अन्याय

हुंडाबळी : कायदेशीर बंदी असूनही हुंड्यासाठी महिलांचा शारीरिक आणि छळ आजही सुरू आहे.

स्त्री भ्रूणहत्या आणि लिंगभेद : मुलगा हवा या हट्टापायी आजही अनेक ठिकाणी मुलींचा जन्म नाकारला जातो किंवा जन्मानंतर त्यांना दुय्यम वागणूक दिली जाते.

हे समाजात प्रामुख्याने दिसणारे प्रकार आहेत. काही ठिकाणी महिला या अन्यायचा प्रतिकार करतात, काही वेळा हसत मुखाने सहन करतात. पूर्वी इतके अन्यायाचे प्रकार दिसत नसले तरी अजून पूर्णपणे बंदही झाले नाहीत. कधीकधी महिलांची लहानपणी पासूनच अशी मानसिकता तयार केली जाते की, अन्यायची जाणीवच होत नाही.

तरीही जागरूकता निर्माण होऊ लागली आहे. अन्यायाची जाणीव होऊ लागली आहे. नवरे खाली माना घालून बसले तर स्वतःमधील कृष्ण जागृत करुन स्वयंसिद्ध झाले पाहिजे, ही सध्याच्या द्रौपदीला जाणीव होत आहे. ही आशादायक पारिस्थिती आहे. आणि हे बदलण्यासाठी महिलांनी महिलांची मदत करावी. सगळेच पुरुष अन्याय करतात असे नाही. काही कृष्ण पण असतात, जे द्रौपदीला मदत करतात. काही काळातच स्त्रिया मानसिक, शारीरिक अन्यायातून पूर्णपणे मुक्त होणार आहेत. सर्वांनाच जागतिक महिला दिनाच्या, सुविचारासाठी मनापासून शुभेच्छा!

जागतिक महिला दिन:स्त्रीशक्तीचा सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

दरवर्षी ८ मार्च रोजी संपूर्ण जगात जागतिक महिला दिन साजरा केला जातो. हा दिवस स्त्रियांच्या कर्तृत्वाचा, संघर्षाचा आणि त्यांच्या हक्कांच्या जाणीवेचा दिवस आहे. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी केलेल्या योगदानाची दखल घेण्यासाठी आणि त्यांना समान संधी मिळाव्यात यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो.

पूर्वीच्या काळात स्त्रियांना शिक्षण, नोकरी, निर्णयस्वातंत्र्य अशा अनेक बाबतीत मर्यादा होत्या. समाजात त्यांना दुय्यम स्थान दिले जात असे. परंतु काळाच्या ओघात अनेक स्त्रियांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, शिक्षण घेतले आणि आपल्या कर्तृत्वाने जगाला आपली ताकद दाखवून दिली. त्यामुळे आज स्त्रिया विज्ञान, शिक्षण, राजकारण, क्रीडा, कला, उद्योग, सैन्य अशा सर्व क्षेत्रांत यशस्वीपणे कार्य करताना दिसतात.

जागतिक महिला दिनाची सुरुवात विसाव्या शतकाच्या सुरुवातीला झाली. स्त्रियांना मतदानाचा अधिकार, चांगल्या कामाच्या अटी आणि समान हक्क मिळावेत या मागण्यांसाठी अनेक देशांत आंदोलन झाले. त्या संघर्षाच्या स्मरणार्थ ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. आज हा दिवस केवळ आंदोलनाची आठवण नसून स्त्रीच्या सन्मानाचा आणि तिच्या

सामर्थ्याचा उत्सव बनला आहे.

भारतातील इतिहासातही स्त्रियांचे योगदान अत्यंत मोठे आहे. जिजाऊ, सावित्रीबाई फुले, राणी लक्ष्मीबाई यांसारख्या स्त्रियांनी आपल्या कार्याने समाजाला दिशा दिली. आजही अनेक स्त्रिया विज्ञान, प्रशासन, क्रीडा आणि उद्योग क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करीत आहेत.

उद्धव भयवाळ
छ. संभाजीनगर मो ८८८८९२५४८८

स्त्री ही केवळ घर सांभाळणारी व्यक्ती नसून ती कुटुंबाची आधारस्तंभ असते. आई, बहीण, मुलगी, पत्नी अशा अनेक भूमिकांतून ती प्रेम, त्याग आणि जिद्दीचे उदाहरण घालून देते. घर आणि करिअर यांचा समतोल साधत ती समाजाच्या प्रगतीत मोठे योगदान देत आहे. त्यामुळे स्त्रीचा सन्मान करणे ही केवळ एका दिवसाची गोष्ट नसून ती आपली कायमची जबाबदारी आहे.

तथापि, आजही काही ठिकाणी स्त्रियांवर अन्याय, भेदभाव आणि हिंसाचाराच्या घटना घडतात. मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतात. या समस्या दूर करण्यासाठी समाजाने जागरूक होणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता दोघांनाही समान संधी दिल्यास समाज अधिक समृद्ध आणि प्रगत होईल.

जागतिक महिला दिन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो – स्त्री आणि पुरुष हे समाजाचे समान घटक आहेत. स्त्रीला सन्मान, सुरक्षितता आणि संधी मिळाल्यास ती केवळ स्वतःचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे भविष्य उज्ज्वल करू शकते. म्हणूनच प्रत्येकाने स्त्रीचा आदर करावा, तिच्या स्वप्नांना बळ द्यावे आणि समानतेचा विचार स्वीकारावा.

स्त्रीशक्तीचा सन्मान, तिच्या कर्तृत्वाचा गौरव आणि समानतेचा संदेश देणारा हा दिवस खऱ्या अर्थाने समाजाला प्रगतीच्या दिशेने नेणारा ठरतो.

स्त्री: एक दृष्टीकोन

ज्योतिर्मय साहित्य

''यत्र नार्यस्तू पुज्यन्ते रमन्ते तत्र देवतः''

अर्थात जिथे महिलांची पूजा होते तेथे देवाची वसती असते.आयुष्यात आलेल्या स्त्रियांची आदरयुक्त पूजा करावी. त्यांच्या मतांची नोंद घेऊन,शक्य तिथे त्याची अंमलबजावणी करावी. त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. शिक्षक म्हणून शिकवित असतांना शाळेतील विद्यार्थिनी कन्या स्वरूपात मानल्या पाहिजे. म्हणजे त्या सुद्धा पित्यासमान मान देतात. शाळेतील शिक्षिका बहिणीप्रमाणे असतात हा भाव मनात असावा. आपले शेजारी आपणासाठी खरे नातेवाईकच. गरज पडताच सावली सारखे पाठीशी उभे राहतात. शेजारच्या मुली व सुना यांना आपण तोच दर्जा द्यावा जो आपण आपल्या मुली व सूना यांना देतो. हीच कायम असावी धारणा. कार्यक्षेत्र कोणतेही असो तेथील सर्वांचे नाते भाऊ व बहीण असे असावे. साहित्य क्षेत्र असेल तर लेखन करतांना स्त्रियांचा अपमान होऊ दिला नाही एवढेच नाही तर समाजातील स्त्रियांबद्दलचे अपमानजनक विनोद प्रकर्षाने टाळावेत. अशा लिखाणाबद्दल सर्वांनी नाराजी व्यक्त केली पाहिजे. आपणं शिवरायांचे वारसदार. स्त्रियांचा शिवरायांनी किती सन्मान केला हे सर्वश्रुत आहे. शिवरायांचे नाव घेतांना आपली ही जबाबदारी वाढते. दैनंदिन जीवनात येणाऱ्या स्त्रियांबद्दलचे मत चांगले व आदरयुक्त असावे. कुठेही अजाणतेपणे त्यांचे मन दुखू नये



असे मला वाटते. बहुतेक स्त्रिया कष्टाळू, सहनशील, सर्वांना जोडणाऱ्या आपुलकीने वागणाऱ्या, तडजोड करणाऱ्या, वेळ पडल्यास वाद होवू नये म्हणून पडती बाजू घेणाऱ्या अशा असतात.

परिवारातील आई, बहीण, कन्या, सून, आत्या, मावशी या सर्व स्त्रिया मानपान सोडला तर आपणास मार्गदर्शक असतात. आईचे गुणवर्णन करण्यासाठी माझे शब्द अपुरे पडतात.

अरविंद कुळकर्णी
छत्रपती संभाजी नगर

घरची गृहलक्ष्मी एक कर्तव्यदक्ष गृहिणी, शेजारधर्म पाळणारी, समोरच्या व्यक्तींच्या भावना समजून घेणारी, जातपात विरहित विचार करणारी, सर्वांना समान समजणारी, सर्वांच्या सुखदुःखात सहभागी होणारी अशी एक संवेदनशील स्त्री.आपल्या यशाने हुरळून न जाता भविष्यातील उत्तुंग यशासाठी त्यातील बारकावे शोधणारी व प्रोत्साहित करणारी असते.जीवनात दुसऱ्याच्या यशासाठी कौतुकाची थाप देणे, त्याचे मनापासून कौतुक करणे, पुढील मार्गात त्याला योग्य दिशा देणे कृतियुक्त मार्गदर्शन करणे, असे हे दिलखुलास व्यक्तिमत्व घरातील स्त्रीचे असते.

एक स्त्री उभी राहिली तर परिवार कसा पुन्हा उभा राहतो याचाही एक अनुभव प्रत्येकाने घेतलाच असेल. अनुभवापेक्षा मोठा गुरू नाही याचा प्रत्यय येतो. असा दृष्टिकोन अंगिकारल्यास खऱ्या अर्थाने आपण जागतिक महिला दिन साजरा केला असे म्हणावे लागेल. सर्व कर्तव्यदक्ष, आदरणीय स्त्रियांना वंदन. सर्वांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

महिलांना मिळणाऱ्या सुविधा पुरेशा आहेत का?

ज्योतिर्मय साहित्य

भारतात महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वातंत्र्य (उदा. उद्योगिनी, जन-धन) आणि कायदेशीर हक्कांच्या अनेक सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, वाढते गुन्हे, सुरक्षिततेचा अभाव आणि ग्रामीण-शहरी भागातील दरी यामुळे या सुविधा अजूनही पूर्णपणे पुरेशा मानल्या जात नाहीत आणि अधिक सुधारणेची गरज आहे.

आज महिला निश्चितच पूर्वीपेक्षा अधिक स्वतंत्र आणि सक्षम आहेत. शिक्षण, रोजगार आणि कायद्याच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक-आर्थिक पातळीवर लक्षणीय प्रगती केली आहे. तथापि, सुरक्षितता, पितृसत्ताक विचारसरणी आणि समान हक्कांसाठी संघर्ष सुरू असल्याने पूर्ण स्वातंत्र्य हे एक आव्हान आहे.

भारतातील महिलांना समानता, शिक्षण आणि कामाचा अधिकार आहे.

महिला आता स्वावलंबी होत आहेत, कॉर्पोरेटपासून स्टार्ट-अपपर्यंत प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत.

शिक्षणाच्या प्रसारामुळे महिलांच्या निर्णय घेण्याची क्षमता वाढली आहे.

पंचायत पातळीपासून संसदेपर्यंत महिला नेतृत्वाची पदे घेत आहेत.

मात्र महिला पूर्ण रूपान स्वतंत्र आहे किंवा महिला स्वातंत्र्य हे लक्षणीय प्रगती आणि एकूणच आव्हानांचे एक जटिल चित्र दर्शवते. जरी भारतीय संविधान महिलांना समानता, हक्क आणि न्यायाची हमी देते, तरी मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' इत्यादी अनेक मोहिमा सुरू आहेत. पण या सुविधा पुरेशा आहेत का?घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी कायदे आहेत. तरीही, सार्वजनिक ठिकाणी महिलांची सुरक्षितता हा अजूनही एक मोठा प्रश्न आहे.कायदे असूनही महिलांवरील गुन्हे वाढत

आहेत, ज्यामुळे सुरक्षिततेच्या उपाययोजना अधिक कडक करण्याची गरज आहे.

हिंसाचार आणि असुरक्षितता हे मुक्त हालचालींमध्ये मोठे अडथळे ठरत आहेत. संयुक्त राष्ट्र महिला २०२६ च्या अहवालानुसार, महिलांना पुरुषांना असलेल्या कायदेशीर अधिकारांपैकी फक्त ६४% अधिकार आहेत.

महिला आणि मुलींना न्याय मिळावा यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांच्या एका नवीन अहवालात असा इशारा देण्यात आला आहे की जगभरातील महिला आणि मुलींना कायदेशीर असमानतेचा सामना करावा लागत आहे.

५४ टक्के देशांमध्ये, बलात्काराची व्याख्या अजूनही संमतीच्या संदर्भात केलेली नाही. याचा अर्थ असा की जरी एखाद्या महिलेवर बलात्कार झाला तरी कायदा त्याला गुन्हा म्हणून ओळखत नाही.

जवळजवळ तीन चतुर्थांश देशांमध्ये, राष्ट्रीय कायद्यानुसार मुलींना अजूनही लग्नासाठी भाग पाडले जाऊ शकते.

४४ टक्के देशांमध्ये, समान मूल्याच्या कामासाठी समान वेतनाची कायदेशीर तरतूद नाही. याचा अर्थ असा की समान कामासाठी देखील महिलांना अनेकदा पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. अहवालानुसार, ही कायदेशीर असमानता महिला आणि मुलींच्या सुरक्षितता, संधी आणि सामाजिक न्यायाच्या प्रवेशावर गंभीर परिणाम करते.

पारंपारिक पितृसत्ताक विचारसरणी ग्रामीण आणि अनेक शहरी भागात महिलांच्या निवडी मर्यादित करते.

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा, मो.९५६१५९४३०६

महिलांचा राजकीय सहभाग आहे. त्या शिक्षित आणि स्वावलंबी आहेत. पण अजूनही अनेक प्रश्न उभे राहतात. आपण खरोखरच स्वतंत्र आहोत का? काही महिलांना ''अतिस्वातंत्र्य'' आहेत आणि त्यापैकी काही अजूनही कोणत्या ना कोणत्या कारणाने दडपल्या जातात. काही महिलांसाठी, स्वातंत्र्य हे एक जिवंत वास्तव आहे तर बहुसंख्य महिलांसाठी ते अजूनही एक दूरचे स्वप्न आहे.

शहरी भागातील विशेषाधिकृत महिलांचा एक छोटासा भाग स्वातंत्र्याचा आनंद घेतो कारण त्या शिक्षित, सामाजिकदृष्ट्या मुक्त आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहेत.

जेव्हा आपण एखाद्या महिलेसाठी हे सर्व शब्द वापरतो तेव्हा ते खूप छान वाटते, पण त्या अजूनही संघर्ष करत असतात.

तथापि, त्यांचा संघर्ष मूलभूत हक्कांसाठी नाही - तो समाजाने त्यांच्या स्वातंत्र्याचा स्वीकार करण्यासाठी, त्यांच्या आवडी आणि निवडींचा स्वीकार करण्यासाठी आहे. परंतु तो बहुसंख्य लोकांना तोंड देत असलेल्या संघर्षापेक्षा वेगळा आहे. एकीकडे, अशा महिला आहेत ज्या सीईओ, राजकारणी, कलाकार आणि प्रत्येक क्षेत्रात नेत्या आहेत, जागतिक स्तरावर स्पर्धा करत आहेत. त्यांचे यश आपल्याला महिला सक्षमीकरणाची उदाहरणे दाखवते.

दुसरीकडे, अशा महिला आहेत ज्यांचे जीवन मूलभूत प्रतिष्ठेसाठी दररोज संघर्ष करत असते. त्यांना कुपोषण, सक्तीचे काम, हिंसाचार आणि स्वतःच्या शरीरावर आणि जीवनावर नियंत्रण नसणे यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. महिला स्वतंत्र आहेत, परंतु पूर्णपणे स्वतंत्र नाहीत. स्वातंत्र्य आता उजव्या कडून सामाजिक स्वीकृती कडे जात आहे.

****

महिला दिन कधी असतो?

ज्योतिर्मय साहित्य

ज्या दिवशी सून सगळ्या जबाबदारी निभावते तेव्हा तिची सासू किंवा नवरा एकदा त्याचे कौतुक करतो निदान जाणीव ठेवतो,

तो तिला हवा असणारा दिवस महिलादिन असतो

तिच्या इच्छा पायदळी तुडवून पुरुषी अहंकार तिला डिवचतो, मुले झाल्यावर त्यांच सगळ तारेवरची कसरत करुन मुल मुली वाट्टेल तसे बोलून तिचा

उरला सुरला विश्वास घात करतात, तेव्हा आत्मसन्मानासाठी पुन्हा नव्याने ती उभी राहते तो दिवस महिला दिन असतो.

नवरा कसाही वागला तरी तिला माहेरचा मार्ग बंद असतो, सतत कारस्थाने करुन जावा, नणंदा महिला असूनही ती सहन करते. म्हणून तिचा पाणउतारा करतात, याला सासूचा पुर्ण पाठिंबा असतो. हे पचवून ती आपल विश्व वेगळ करुन आपल स्थान सिध्द करते.

तो दिवस महिला दिन असतो

जग तिला एकटीला जगून देत नाही

कारण बाहेर तिला छळणारा ठिकठिकाणी

राक्षसच असतो, संसार रेटून तिचा स्वत:साठी मुक्त होऊन मोकळा श्वास च नसतो,

तिला तिच्या भावना मत असतात हे ती सुनावते,

तो दिवस महिला दिन असतो...

ती सक्षम असतेच, तिच्या कर्तुत्वाला टाळ्या वाजवून समाज तिला मान देतो. ती ही घर नोकरी करुन दमते, त्याची कदर करुन जेव्हा तिला मदतीचा हात मिळतो,

तो दिवस महिला दिन असतो...

तिला आत्मविश्वास देऊन तिची भरारी बघून आई वडीलांना आनंद होतो, जेव्हा ती तिची लढाई ताकदीने लढून घट्ट पाय रोवून विजयाचा झेंडा फ़डकवते,

तोच खरा महिला दिन असतो...

चूल मूल सोडून तिचा अधिकार तिच्या सुरक्षेचा कायदा ही नसतो, तिच्यावर बलात्कार करणारा नराधमाला वकील या देशात मिळतो,

जेव्हा त्यांनातिच्यादेखत जिंवत जाळले जाईल, पुन्हा कुणी त्या भितीनेच तिला हात लावणार नाही हे समाज आपणहून करेल, तो खरा महिला दिन असतो...

भारतात मुली मुल समान आहेत, तिथे स्त्रिला मान सन्मान आहे, ही भारताची संस्कृती आहे याची जगाला जाणीव होईल,

तो खरा महिला दिन असतो....

भारतमाता ही स्त्री चे रुप, शेवटी हिच दुर्गा हिच काली हे समाज मान्य करतो

तोच दिवस महिला दिन असतो....

महिलादिनाच्या शुभेच्छा !

✍ माधुरी पळणिटकर, सातारा, मो. 99214 95533

''ती''...हरणारी नाही, जिंकणारी आहे...!

ज्योतिर्मय साहित्य

आजपर्यंतच्या वाटचालीत तुम्ही दूरदृष्टी विचारांची वाटचाल करण्यासाठी स्वतःमध्ये अमुलाग्र बदल केले असतील..

रस्ता कितीही सोपा आणि दूरवर दिसत असला तरी प्रत्यक्षात तो पार करताना कितीतरी अडथळे अचानक पणे तुमच्या भूतकाळातील आणि वर्तमानातील वाटचालीत आले असतील काहींचा सामना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे तुम्ही केलाही असेल आणि करत असाल... पण काही अडथळ्यांनी तुम्हाला जगायला आणि सावरायलाही शिकवले असेल... अशी अडथळा रूपी वादळे आयुष्याच्या चढ-उतारावर तुम्हाला कदाचित पुन्हा भेटतीलही... वादळं आलं म्हणून रस्ता बदलनारही नाही त्यामुळे त्यातील असंख्य गोष्टी तुम्हाला जगायला प्रेरणा घेऊन आलेल्या असतील... कदाचित स्वप्नांच्या पलिकडच्या

✍ दिपक पवार, चिंधवली मो. 75883 82445

ही गोष्टी त्यामध्ये तुम्हाला सापडतील आणि तुम्हाला देईल जगण्याच आणखी नव बळं... आणि हेच बळ, हिच ताकद अनेकांना प्रेरणादायी ठरेल.. म्हणूनच ह्याच महिला दिनानिमित्त औचित्य म्हणून शुभेच्छा नाही पण कायमच त्या इतरांना प्रेरणादायी ठरणाऱ्या वाटचालीसाठी आनंददायी शुभेच्छा असतील....

जागतिक महिला दिन : सन्मानाचा उत्सव की संघर्षांची जाणीव?

जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. पण हा केवळ शुभेच्छांचा, गुलाबांच्या फुलांचा आणि सोशल मीडियावरच्या पोस्टांचा दिवस आहे का? की हा दिवस आहे आत्मपरीक्षणाचा. समाज म्हणून आपण स्त्रीच्या सन्मान, सुरक्षितता आणि समानतेसाठी नेमकं काय केलं याचा हिशेब मांडण्याचा? जागतिक महिला दिनाची संकल्पना ही फक्त उत्सवासाठी जन्माला आलेली नाही. १९०८ साली न्यूयॉर्क येथे कामगार महिलांनी समान वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मतदानाचा अधिकार यासाठी आंदोलन छेडले. त्या आंदोलनातून उगम पावलेला हा दिवस पुढे युनायटेड नॅशन्सने १९७५ मध्ये याला अधिकृत मान्यता दिली आणि जगभर स्त्री-अधिकारांच्या लढ्याचे प्रतीक म्हणून तो साजरा होऊ लागला. म्हणजेच, हा दिवस आहे संघर्षाचा, स्वाभिमानाचा आणि परिवर्तनाचा.

भारतात स्त्री शिक्षणाची टक्केवारी वाढली आहे, अनेक महिला प्रशासन, उद्योग, विज्ञान, क्रीडा, राजकारण अशा सर्व क्षेत्रांत झेंडा रोवत आहेत. द्रौपदी मुर्मू राष्ट्रपतीपदी विराजमान आहेत; वित्त, संरक्षण, अवकाश संशोधन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांत महिलांनी नेतृत्व सिद्ध केले आहे. पण दुसरीकडे, घरगुती हिंसाचार, लैंगिक अत्याचार, कार्यस्थळी छळ, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या या सारख्या समस्या अजूनही विदारक वास्तव म्हणून समोर आहेत. शिक्षण घेतलेल्या, आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या महिलेलाही सुरक्षिततेची हमी नाही, ही वस्तुस्थिती मन हेलावून टाकणारी आहे. महिलांच्या सन्मानासाठी कायदे झाले, २०१३ चा 'कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा', बालविवाह प्रतिबंध, घरेलू हिंसाचार प्रतिबंध पण कायदे कागदावर असले तरी त्यांची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे? समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री सन्मानाचे स्वप्न पूर्ण होणार नाही. ''स्त्री-पुरुष समान आहेत'' ही घोषणा आपण सहज करतो पण घरातील कामांची विभागणी पाहिली, तर अजूनही स्वयंपाकघराची जबाबदारी स्त्रीचीच मानली जाते. नोकरी करणारी स्त्री असो वा गृहिणी तिचा दिवस पहाटेपासून रात्रीपर्यंत कष्टांनी भरलेला असतो. तिच्या श्रमाला 'कर्तव्य' म्हणत आपण त्याची किंमत मोजतच नाही. ग्रामीण भागात तर अजूनही अनेक मुली शिक्षणाऐवजी घरकाम किंवा लवकर लग्नाच्या चक्रात अडकतात. शहरात करिअर करणाऱ्या महिलेला 'घर सांभाळशील का?' हा प्रश्न विचारला जातो; पण पुरुषाला 'घर सांभाळशील का?' असा प्रश्न विचारला जात नाही. हीच मानसिक

दरी आहे.

स्त्री म्हणजे केवळ नात्यांची ओळख नाही तर आई, बहीण, पत्नी, मुलगी या नात्यांतूनच स्त्रीची ओळख ठरवण्याची सवय आपण लावून घेतली आहे. पण ती केवळ कोणाची तरी 'आई' किंवा 'पत्नी' नाही; ती स्वतःच्या स्वप्नांची, ध्येयांची, क्षमतेची स्वतंत्र व्यक्ती आहे. सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू करताना समाजाच्या प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर दगड-चिखल फेकला गेला, अपमान झाला; पण त्यांनी हार मानली नाही. आज शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींची वाढती संख्या ही त्याच संघर्षाची फलश्रुती आहे. स्त्रीशक्तीचे प्रतीक म्हणून आपण देवींची पूजा करतो, पण घरातील स्त्रीला निर्णयप्रक्रियेत समान स्थान देतो का? पूजा आणि प्रत्यक्ष वागणूक यातला विरोधाभास आजही जिवंत आहे.

स्त्री रात्री उशिरा सुरक्षितपणे रस्त्यावर चालू शकेल का? हा प्रश्न आजही उत्तराच्या प्रतीक्षेत आहे. मुलींना लहानपणापासून ''सावध रहा, असे करू नकोस, तिथे जाऊ नकोस'' असे शिकवले जाते; पण मुलांना ''आदर कर, जबाबदारीने वाग'' हे कितपत शिकवले जाते? महिला सुरक्षेचे प्रश्न केवळ पोलिस-प्रशासनापुरते मर्यादित नाहीत; ते सामाजिक संस्कारांशी जोडलेले आहेत. घरापासून शाळेपर्यंत आणि माध्यमांपासून मनोरंजनापर्यंत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा शक्तिशाली मंच आहे. महिलांना स्वतःचा आवाज मांडण्याची संधी मिळाली आहे; पण त्याचबरोबर ऑनलाइन ट्रोलिंग, सायबर छळ, अपमानास्पद टिप्पणी यांचाही सामना करावा लागतो. एका बाजूला महिला पायलट, शास्त्रज्ञ, खेळाडू म्हणून देशाचा अभिमान वाढवत आहेत; तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या कपड्यांवर, व्यक्तिमत्त्वावर टीका केली जाते. स्त्रीची कर्तृत्वापेक्षा तिच्या बाह्य रूपावर अधिक चर्चा होते, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे.

प्रविण बागडे
नागपूर

महिला दिनी भाषणे, सन्मान सोहळे, पुरस्कार हे सर्व महत्त्वाचे आहेत पण तेवढ्याने परिवर्तन घडणार नाही. बदलाची सुरुवात घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, समान संस्कार, समान अपेक्षा दिल्या पाहिजेत. शाळांमध्ये लिंग-संवेदनशील शिक्षण आवश्यक आहे. माध्यमांनी जबाबदारीने स्त्रीप्रतिमा मांडली पाहिजे. राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे. निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज अधिक प्रभावी झाला पाहिजे. स्त्री रोज लढते कधी घरात, कधी कामावर, कधी समाजात आणि कधी स्वतःच्या मनात. तिच्या डोळ्यात स्वप्ने असतात पण त्यांना पूर्ण करण्यासाठी तिला अनेक अडथळ्यांवर मात करावी लागते. जागतिक महिला दिन हा तिच्या संघर्षाला सलाम करण्याचा दिवस आहे. तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि सहनशक्तीचा सन्मान करण्याचा दिवस आहे पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे हा दिवस आहे तिच्या वेदना समजून घेण्याचा, तिच्या आवाजाला ऐकण्याचा आणि तिच्या सोबत उभे राहण्याचा.

८ मार्च हा फक्त कॅलेंडरवरील एक दिवस नाही; तो समाजाच्या प्रगतीचा आरसा आहे. आपण खरोखरच स्त्रीला समानतेचे स्थान दिले आहे का? की अजूनही ती अनेक बंधनांत अडकलेली आहे? महिला दिनाच्या शुभेच्छा देताना आपण एक वचन देऊ या स्त्रीला केवळ सन्मानाचे शब्द नव्हे, तर समानतेची संधी देऊ, तिच्या स्वप्नांना आकाश देऊ आणि तिच्या सुरक्षिततेची हमी देऊ. स्त्री सशक्त झाली, तर समाज सशक्त होईल. कारण स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नाही तर ती राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे. जागतिक महिला दिनानिमित्त प्रत्येक स्त्रीला मनापासून सलाम तिच्या अस्तित्वाला, तिच्या संघर्षाला आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठीच्या आशेला. हा दिवस उत्सवाचा असो पण त्याहून अधिक परिवर्तनाचा असो. स्त्री ही शक्ती आहे, संवेदना आहे, संघर्ष आहे आणि सृजन आहे. तिच्याशिवाय समाज अपूर्ण आहे; तिच्या सन्मानाशिवाय प्रगती अपूर्ण आहे.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना आर्थिक स्वातंत्र्य हा महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वतः कमावणारी स्त्री निर्णय घेण्यास अधिक सक्षम होते. स्वयं-सहाय्यता गट, स्टार्टअप्स, लघुउद्योग यांमुळे अनेक महिलांनी आर्थिक स्वावलंबन मिळवले आहे. परंतु वेतनातील असमानता अजूनही दिसते. समान कामासाठी समान वेतन ही संकल्पना अजून पूर्णत्वाला गेलेली नाही. ग्रामीण शेतमजुरीपासून ते कॉर्पोरेट कार्यालयांपर्यंत महिलांना अनेकदा कमी मोबदला दिला जातो. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ पैसा नव्हे; तो आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सन्मान यांचा पाया आहे. तुमच्या कर्तृत्वाला नवं आकाश लाभो, स्वप्नांना नवी दिशा मिळो आणि आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर सन्मान, सुरक्षितता आणि समानतेची साथ लाभो, हीच सदिच्छा. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना मनः पूर्वक शुभेच्छा!

महिला दिन : आईने मुलाला समानतेची दीक्षा देण्याचा दिवस

प्रवीण टाके
उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर ९७०२८५८७७७

ज्योतिर्मय साहित्य

'जागतिक महिला दिन' (८ मार्च) हा केवळ साजरा करण्याचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा, नव्या संकल्पांचा आणि पुढच्या पिढीसमोर नवा आदर्श ठेवण्याचा दिवस आहे. समाज परिवर्तनाच्या वाटचालीत स्त्री-पुरुष समानतेचा विचार हा केवळ घोषवाक्य न राहता तो घराघरात कृतीत उतरला पाहिजे. त्यासाठी पुरुषांच्या तुलनेत महिलांनी काकणभर पुढे सहभाग नोंदवला पाहिजे. त्यासाठी आपापल्या घरातील मुलींना नव्हे मुलांना लिंग समानतेचा संदेश देण्याची, आजची खरी गरज आहे.

राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण, गृह, सामाजिक न्याय, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व जवळपास सर्वच विभागामार्फत महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना व धोरण राबवले जाते. राज्य महिला आयोगही स्वतंत्रपणे काम करते. मात्र शासनासोबतच समानतेच्या शिक्षणाची घराघरात प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे.

भारतीय समाजाने परंपरांचा वारसा जपला आहे; या परंपरांमध्ये पितृसत्ताक विचारांचा पगडा अद्यापही दिसून येतो. घरामध्ये मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, वागणूक आणि प्रोत्साहन मिळणे अजूनही सर्व स्तरांवर पूर्णत्वास गेलेले नाही. मुलाने कसे वागावे, मुलीने कसे वागावे, कोणते कपडे योग्य आणि कोणते अयोग्य, अशा अनेक पूर्वग्रहांनी अजूनही अनेक घरांची दारे बंदिस्त आहेत. या बंद दारांना उघडण्याची किल्ली म्हणजे शिक्षण,संवाद आणि आधुनिक दृष्टिकोन. आजच्या नवशिक्षित व अशिक्षित मातांनीही नव्या समाज निर्मितीसाठी आपले हे दायित्व समजून घेणे म्हणजे महिला दिन साजरे करणे होय.

लहानपणापासूनच मुलांना 'हे मुलांचे काम, हे मुलींचे काम' असे शिकवले तर त्यांच्या मनावर लिंगभेदाचे ठसे उमटतात. यामुळेच आपल्यापेक्षा वयस्क आईला पिण्याचे पाणी हातात मागणारी, जेवणाचे ताट धुवायला लावणारी, आंघोळीनंतर स्वत:ची चड्डी बनियनही धुवायला लावणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. एकीकडे 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' म्हणायचे आणि स्वतःचे ताट आईला धुवायला लावायचे. यामध्ये सर्वात वाईट म्हणजे आईने म्हातारपणाची काठी म्हणून धन्यता मानायची, ही संस्कृती आपल्यातला लिंगभेद कधीही नष्ट करणार नाही. त्यामुळे मुलगा असो की मुलगी लहानपणापासूनच घरकाम, खेळ, बालसंगोपन, आई-वडिलांच्या म्हातारपणाची जबाबदारी , आर्थिक निर्णयप्रक्रिया यामध्ये समान सहभागाची सवय लावणे गरजेचे आहे. किंबहुना घरातील वडिलांनी याबाबत आदर्श पुढे ठेवणे गरजेचे आहे.

सहशिक्षण आणि परस्पर आदराची जाणीव ही समतेची पहिली पायरी आहे. शाळा आणि घर या दोन्ही ठिकाणी 'आपली मैत्रीण ही कुणाची तरी बहीण आहे' आणि 'आपल्या बहिणीलाही मित्र असू शकतो' ही सहज आणि सन्मानपूर्वक मान्यता देणे,ती मुलांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर स्त्री व पुरुष या लिंगासोबत एक तृतीय लिंगी समाज आपल्याच घरातून तयार होतो. अशा मुलांना मुलगा किंवा मुलगी म्हणून नैसर्गिक बदलानुसार जगण्याचे स्वातंत्र्य आहे. अशा तृतीय पंथीयांना देखील सन्मानाने जगण्याचा तुमच्या सारखाच अधिकार आहे, ही जाणीव मुलांना लहाणपणीच होणे आवश्यक आहे. ही जाणीव मुलांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनवते.

वयात येणे ही प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्या आयुष्यातील नैसर्गिक प्रक्रिया आहे. या विषयांवर घराघरांत मोकळेपणाने, वैज्ञानिक दृष्टीकोनातून चर्चा होणे आवश्यक आहे. लैंगिक शिक्षण ही संस्कृतीवरील घाला नसून नव्या विज्ञानवादी संस्कृतीची पायाभरणी आहे. माध्यमिक शिक्षणात प्रजनन आणि लैंगिक आरोग्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळाल्यास गैरसमज, भीती आणि चुकीच्या समजुती दूर होऊ शकतात. अगदी लहान वयातच 'गुड टच बॅड टच' याची माहिती मुलांना देणे हे त्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा शिक्षणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होतात.सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतामध्ये घरात होणाऱ्या लैंगिक शोषणाला, नात्यात होणाऱ्या लैंगिक शोषणाला या छोट्याशा गोष्टीमुळे पायबंद बसू शकतो, हे लक्षात घेण्याचाही आजचा दिवस आहे.

घरामध्ये आईची भूमिका या परिवर्तनात अत्यंत महत्त्वाची ठरते. आई ही केवळ कुटुंबाची आधारवड नसून मूल्यांची पहिली शाळा असते. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेद न करता दोघांनाही समान प्रेम, समान शिस्त, समान जाणीव आणि समान संधी देणे हे तिच्या हातात आहे. मुलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, मुलींना स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य देणे, महिलांप्रती मुलांमध्ये आदर निर्माण करणे, या कृतीतून समतेचा पाया मजबूत होतो. कुणाचीही बहिण असो, तिच्यासोबत कसे वागावे, याचे बाळकडून प्रत्येक घरातील आईनेच देणे महत्वाचे आहे. घरातून हा भेद नाकारला, घरातून त्यासाठी कृतीशील वस्तूपाठ अंमलात आला तर 'निर्भया' प्रकरणासारख्या घटना देशात घडणार नाही. या पायाभरणीची शपथ घेण्याचाही आजचा दिवस आहे.

संपत्ती आणि वारसा या संदर्भातही समानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. 'बायकांना व्यवहारात ठेवू नये ', 'महिलांना व्यवहारातले काय कळते ', या पूर्वापार अंधश्रद्धांना दूर करण्याचाही आजचा दिवस आहे.

शेतीच्या काही गुंठ्यांसाठी सही करण्यापुरतीच बहिणीची भूमिका मर्यादित नाही, हे समजून घेतले पाहिजे. जमिनीच्या बाबत तिचे स्वप्न, तिची मेहनत आणि तिचे निर्णय यांनाही स्थान असायला हवे. लहानपणापासूनच मुलींना आर्थिक साक्षरता, मालमत्तेची जाणीव आणि स्वावलंबनाचे शिक्षण देणे ही नव्या समाजव्यवस्थेची गरज आहे. यासाठी स्वतः आईने या समान हक्काची पेरणी लहानपणीच करण्याचा आजचा दिवस आहे.

कर्मकांड आणि रूढीपरंपरांमध्ये स्त्रियांच्या शुद्ध-अशुद्धतेच्या मान्यता आजही काही ठिकाणी आढळतात. परंतु नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया ही कोणत्याही प्रकारे अपवित्रतेचे लक्षण नाही. देवाला जर काही अपवित्र वाटले असते तर त्यांनी ही क्रियाच निर्माण केली नसती.त्यामुळे शुद्ध अशुद्ध हा भेद कर्मकांडातूनच निर्माण झाला आहे.मासिक पाळी हा स्त्रीदेहाचा नैसर्गिक भाग आहे. यावर खुली चर्चा झाली पाहीजे. या काळात स्त्रियांना वेगळे ठेवणे, त्यांच्या हातचे अन्न न खाणे किंवा धार्मिक विधींमध्ये सहभागी होऊ न देणे या कालबाह्य समजुतींना आता तिलांजली देणे आवश्यक आहे. विज्ञाननिष्ठ, विवेकी आणि संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारून अशा रूढींचा पुनर्विचार करणे हीच खरी संस्कृतीची प्रगती आहे. यातूनच आपली संस्कृती प्रगल्भ होईल. संस्कृती, धर्म, रुढी,परंपरांच्या नावाखाली ज्या घरांमध्ये हा अघोरी उच्छाद सुरू आहे, ती घरे सुसंस्कृत समजायची का यावर चिंतन करण्याचाही आजचा दिवस आहे.

सामाजिक व्यवहारातही समानतेची जाणीव महत्त्वाची आहे. मुलगी सासरी जाणे हीच एकमेव दिशा नसून घरजावई होणेही तितकेच सन्माननीय असू शकते, ही मानसिकता समाजात रुजवणे आवश्यक आहे. त्यामुळे जशी आपली मुलगी सासरी जाऊ शकते तसाच आपला मुलगा घर जावई जाऊ शकतो, हे सामाजिक सत्य बिंबविण्याचाही आज दिवस आहे.

कार्यालयातील महिलांच्या पेहरावावर किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उपरोधिक टिप्पणी करणे ही सवय थांबली पाहिजे. एखाद्या महिलेच्या पोशाखाबद्दल नकारात्मक प्रतिक्रिया देणे हे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा अपमान तर आहेच, पण आपल्यातील समतेच्या शिक्षणातील उणीवही दर्शवते.परस्पर आदर आणि व्यावसायिकता ही आधुनिक समाजाची ओळख असली पाहिजे.

आजच्या भारतात अशी परिस्थिती निर्माण व्हावी की अर्ध्या रात्री एकटा जाणारा मुलगा आणि एकटी जाणारी मुलगी, या दोघांच्या सुरक्षिततेत कोणताही फरक उरू नये. ही सुरक्षितता केवळ कायद्याने नव्हे, तर घराघरातल्या संस्कारांनी निर्माण होते. मुलगा आणि मुलगी यांच्यातील अंतर कमी करून, त्यांना समानतेचे आणि सहजीवनाचे मूल्य शिकवूनच हा बदल साध्य होईल.तो बदल साधण्यासाठी वचनबद्ध होण्याचा आजचा दिवस आहे.

जगातील अनेक देशांनी लिंग समानतेच्या दिशेने सातत्याने प्रयत्न केले आहेत. उदाहरणार्थ स्वीडन, नॉर्वे, फिनलँड या देशांमध्ये पालकत्व रजेचे धोरण स्त्री-पुरुष दोघांसाठी समान आहे. त्यामुळे मुलांची जबाबदारी केवळ आईची हा समज आपोआप कमी झाला.

आइसलँड या देशाने समान कामासाठी समान वेतन हा कायदा कठोरपणे अंमलात आणला. न्यूझीलंडने राजकीय नेतृत्वात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवून सामाजिक दृष्टिकोनात बदल घडवून आणला.

पाश्चात्त्य देशांमध्ये लिंगभेदाची समस्या पूर्णतः संपली असे म्हणता येणार नाही; परंतु ती कमी निश्चित झाली आहे. यासाठी वयाला अनुरूप लैंगिक शिक्षण अनिवार्य आहे. त्यामुळे शरीर, भावना आणि परस्पर आदर याबाबत खुला संवाद निर्माण झाला. भारतीय घटनेनेही कलम १४ व १५ अन्वये लिंगभेद अमान्य केला आहे.

१९०८ मध्ये महिला कामगारांनी न्यूयार्कमध्ये समान हक्कासाठी लढा उभारला. त्यातूनच १९११ पासून आस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनीत महिला दिनाची सुरुवात झाली. संयुक्त राष्ट्राने ८ मार्च १९७५ ला महिला दिनाला मान्यता दिली. असा हा दीर्घ प्रवास आहे. हा उत्सवाचा दिवस असावाच पण हक्काच्या लढयाची त्यामध्ये जाणीवही असावी. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारू या आपल्या घरात, आपल्या वागण्यात, आपल्या शब्दांत समतेचा संदेश कितपत दिसतो? जर हा संदेश अजून अपुरा असेल, तर आजपासून त्याची सुरुवात करू या. मुलांच्या मनात आदर, संवेदनशीलता आणि समानतेची बीजे पेरू या. कारण आजची मुलेच उद्याचा समाज घडवणार आहेत. त्यामुळे लिंगभेद विरहित समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा आजचा दिवस आहे.

त्यामुळे आजचा महिला दिवस साजरा करताना स्वतःच्या स्वातंत्र्य समता आणि प्रगती सोबतच आपल्या घरातील मुलांना देखील या बदलाचे साक्षीदार बनविण्यासाठी स्वतः महिलांनी प्रयत्न करणे पुरुषांनी देखील ही बाब समजून घेणे औचित्यपूर्ण ठरणार आहे. चला तर घराघरातील मुलांना लिंग समानतेचा संदेश आपल्या वागण्यातून आणि संस्कारांतून देऊया. हीच खरी महिला दिनाची सार्थकता ठरेल.

***

लोकपरंपरेतील बाईपण ते आत्मभान देणारं आजचं माणूसपण!!

युवराज पाटील,
जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

ज्योतिर्मय साहित्य

''बाई म्हणे देवा, नको सोन्याचा हार, मान द्यावा जगाने, तोच माझा श्रृंगार'' या ओवीतील शब्दांतून स्त्रीच्या सन्मानाच्या अपेक्षा पूर्वीपासून वारंवार व्यक्त होताना दिसतात. या अपेक्षापूर्तीसाठी सामाजिक जाणिवेच्या भावनेतून राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना आत्मसन्मान मिळवून देण्याचे प्रयत्न केले आहेत. चूल आणि मुल या चौकटीत अडकलेल्या स्त्रीला आत्मविश्वासाने माणूस म्हणून जगण्याचा हमरस्ता उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया शासनाने सुरू केली. जुन्या लोकपरंपरागत गीतांमधून व्यक्त होणाऱ्या तिच्या कोंडलेल्या श्वासापासून ते लोकशाही व्यवस्थेत तिला मिळालेल्या बळापर्यंतच्या प्रवासावर प्रकाश टाकणारा हा लेख.!!

भारतीय ग्रामीण जीवनाचा विचार केला, तर स्त्रीचे आयुष्य अनेकदा श्रम, जबाबदाऱ्या आणि कुटुंबाच्या अपेक्षांनी वेढलेले दिसते. घर, शेत, कुटुंब आणि नातेसंबंध यांची जबाबदारी सांभाळत ती शांतपणे आयुष्याची वाट चालत होती. बाहेरून पाहताना तिचे जगणे सहनशीलतेचे आणि मूक स्वीकाराचे वाटत असले, तरी लोकपरंपरेच्या अंतरंगात डोकावले की ग्रामीण स्त्रीचे वेगळेच रूप समोर येते. विशेषतः ओव्या, श्रमगीते आणि जात्यावरच्या गाण्यांमध्ये तिच्या मनातील भावना, अनुभव आणि न्यायाची जाणीव स्पष्टपणे व्यक्त होताना दिसते.

पूर्वीच्या ग्रामीण जीवनात स्त्रीचा दिवस पहाटेपासून सुरू होत असे. घरातील कामे उरकताना, विशेषतः जात्यावर दळण दळताना स्त्रियांच्या ओठांवरून ओव्या उमटत. दळणाच्या तालासोबत शब्दांची लय जुळत जाई आणि त्या लयीमध्ये तिच्या मनातील भावना व्यक्त होत असत.

''जात्यावर दळते मी ज्वारी, माझं मन गेलं माहेरच्या दारी''

या ओवीतून माहेराविषयीची ओढ आणि सासरीच्या आयुष्याची जाणीव सहजपणे व्यक्त होते.

ग्रामीण जीवनात स्त्रीची भूमिका केवळ घरापुरती मर्यादित नव्हती. शेतात निंदणी, कापणी, रोप लावणी यांसारख्या विविध कामांमध्ये स्त्रिया सक्रियपणे सहभागी होत. एकत्र काम करताना त्या गाणी म्हणत आणि त्या गाण्यांतून आपल्या आयुष्याविषयीच्या भावना व्यक्त करत.

''निंदणीची ओळ लांब, ऊन माथ्यावरती,बाईच्या जीवाला वेळ कुठे विश्रांती''

या ओवीतून स्त्रीच्या कष्टमय जीवनाची आणि तिच्या अखंड श्रमांची जाणीव दिसून येते. लोकपरंपरेतील ओव्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या स्त्रीच्या अनुभवांना आणि विचारांना अभिव्यक्ती देतात. अनेकदा या ओव्यांमधून स्त्री आपल्या आयुष्यातील प्रश्नही मांडताना दिसते.

''सासू म्हणे काम कर, नणंद म्हणे ते नको हे कर, या बाईच्या जीवाला बघा कोण विचारं?''

या ओवीतून घरातील जबाबदाऱ्या पार पाडताना स्त्रीला भेडसावणाऱ्या परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते.

प्रसिद्ध लोकसाहित्य अभ्यासक डॉ. ताराबाई भावळकर यांनी ग्रामीण स्त्रियांच्या ओव्यांचा अभ्यास करताना नमूद केले आहे की, या ओव्या केवळ मनोरंजनासाठी नसून त्या स्त्रियांच्या अंतर्मनातील अनुभवांचे आणि भावविश्वाचे प्रतिबिंब आहेत. ग्रामीण स्त्रीला समाजात उघडपणे बोलण्याची संधी कमी मिळत होती; त्यामुळे ती ओव्यांच्या माध्यमातून आपल्या वेदना, प्रश्न आणि न्यायाची जाणीव व्यक्त करत असे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत जात्यावर दळण दळणे किंवा शेतात सामूहिकपणे गाणी म्हणण्याच्या परंपरा कमी झाल्या असल्या तरी या ओव्यांमध्ये जपलेली स्त्रीची संवेदना आणि अनुभव आजही लोकस्मृतीत जिवंत आहेत. लोकपरंपरेतील या ओव्या म्हणजे ग्रामीण स्त्रीच्या आयुष्याचा मौखिक इतिहासच मानता येईल.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने या लोकपरंपरेतील ओव्यांकडे पाहिले, तर स्त्रीच्या वेदनांना अभिव्यक्ती देणारी परंपरा आपल्या समाजात पूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या ओव्या केवळ लोकसाहित्याचा भाग नसून त्या स्त्रीच्या भावना, श्रम आणि आत्मसन्मानाची जाणीव करून देणाऱ्या महत्त्वाचा सांस्कृतिक ठेवा आहेत.

आधुनिक काळात बाईपणाला मानवी मूल्य प्राप्त करून देण्यासाठी शासनाने स्त्रियांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी विविध लोकाभिमुख योजना राबवून महिलांना आत्मभान आणि स्वावलंबनाची नवी दिशा दिली. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून स्वयं-सहाय्यता गटांची चळवळ उभी केली. या गटांमुळे लाखो महिलांना बचत, कर्जसुविधा आणि लघुउद्योगांच्या संधी उपलब्ध झाल्या.

महिलांच्या आरोग्य आणि सन्मानाचा विचार करून राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य योजना, मातृत्व सहाय्य योजना तसेच ग्रामीण भागात सुरक्षित प्रसूतीसाठी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सावित्रीबाई फुले यांच्या नावाने राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक योजना, शिष्यवृत्ती आणि निवासी वसतिगृहे यामुळे अनेक मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान' प्रभावीपणे राबविले जात आहे.

या अभियानाच्या माध्यमातून महिलांचे स्वयं-सहाय्यता गट तयार होऊन बचत, उत्पादन, विपणन आणि लघुउद्योगांना चालना मिळत आहे. यामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबनासोबतच सामाजिक नेतृत्वाची संधीही मिळू लागली आहे.

याशिवाय महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी राज्य शासनाने सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ही विशेष महत्त्वाची ठरत आहे. या योजनेद्वारे पात्र महिलांना दरमहा आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जात असून त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनातील गरजा भागविण्यास मदत होते. या योजनेमुळे महिलांच्या हातात थेट आर्थिक बळ मिळून त्यांचे आत्मभान आणि स्वावलंबन अधिक दृढ होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेल्या आरक्षणामुळे महिलांना निर्णय प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळत आहे. त्यामुळे समाजाच्या विकासात महिलांचे नेतृत्वही अधिक प्रभावीपणे पुढे येत आहे. या सर्व उपक्रमांमुळे आजची स्त्री केवळ घरापुरती मर्यादित राहिलेली नाही. ती राजकारण, विज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. तिच्या कार्याचा समाजात गौरव होत आहे आणि तिच्या योगदानाला योग्य तो बहुमानही मिळत आहे.

लोकपरंपरेतील ओव्यांतून उमटलेली स्त्रीची न्यायाची जाणीव आणि आत्मसन्मानाची भावना आजच्या लोकाभिमुख शासन व्यवस्थेनी राबविलेल्या विविध योजनामुळे अधिक व्यापक स्वरूपात प्रत्यक्ष परिवर्तीत होऊन पुढे येताना दिसते आहे. लोकपरंपरेतील मूक वेदना, संघर्ष आणि आत्मसन्मानाचा शोध घेत चालणारी स्त्री आज शासनाच्या विविध योजनांच्या बळावर अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी बनत आहे.

म्हणूनच लोकपरंपरेतील बाईपणापासून आत्मभानाने उभ्या राहिलेल्या आधुनिक स्त्रीपर्यंतची ही वाटचाल केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याची कथा नाही; ती महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीची दिशा आहे.

लोकपरंपरेतून उमटलेला तिचा मूक आवाज आज सन्मान, अधिकार आणि समानतेच्या नव्या पर्वात रूपांतरित होत आहे. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून समाजघडणीत आपले योगदान देणारी ही नवी स्त्री आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी बनत आहे. म्हणूनच आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने इतकेच म्हणावेसे वाटते

''बाईच्या कष्टांना मान, तिच्या स्वप्नांना आकाश,
समानतेच्या वाटेवरच समाजाचा खरा विकास.''

****